सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN
978-81-940842-0-4

• पुणे • वर्ष : २१ • अंक ०२ • मे २०२५ • पृष्ठे ५६ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी



सहकार भारती राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक नागपूरमध्ये

सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी बैठक मुंबईमध्ये






पतसंस्थांच्या अंशदानाबाबत
सहकार खाते फेरविचार करणार!

पतसंस्थांच्या प्रश्नांबाबत
अनेक महत्त्वपूर्ण निर्णय...



नाशिक पापड महोत्सवात
विक्रमी उलाढाल



NATIONAL URBAN COOPERATIVE FINANCE AND DEVELOPMENT CORPORATION LTD.
NUCFDC

मोठ्या सहकारी बँकांनी
लहान बँकांना
मदतीचा हात द्यावा - मोहोळ

आपला **परिवार,** आपली **संस्था!**
स्थापना-१९९४

## तुमचे सोने करेल,
## तुमचे स्वप्न साकार!



- सुलभ प्रक्रिया
- जलद कर्ज वाटप
- किमान दस्तऐवज

अक्षय तृतिया
# गोल्ड लोन
**0.75*%**
व्याजदर प्रती माह

* अटी व नियम लागू


अधिक माहितीकरीता संपर्क
**9822272947**
**9665936970**
योजना सर्व शाखेत सुरु
आजच जवळच्या शाखेत संपर्क करा




आता
**NEFT** **RTGS**
**IMPS** **UPI**

आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही
बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर
डिजिटल बँकिंग सुविधा
Cash Less बँकिंग व्यवहार

सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था



तुमच्या सेवेत सदैव तत्पर

- **LOCKERS** सुविधा
- **SMS** अर्लट
- **DEPOSIT** सुविधा
- **NEFT, RTGS** सुविधा उपलब्ध
- **MOBILE** बँकिंग
- **₹ 2335 कोटींच्या** वर व्यवसाय
- **GOLD LOAN** उपलब्ध
- **CORE** बँकिंग
- **LIC पॉलिसी काढण्याची** व प्रीमियम भरण्याची सुविधा
- **MSEDCL** विज बिल भरणा केंद्र
- **LOAN सेवा** सुविधा
- **GIC पॉलिसी काढण्याची** व नुतनीकरणाची सुविधा

# दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
31 वर्षे विश्वासाचे

**मुख्य कार्यालय :** प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
**फोन : 0712-2220716, 2524337, 2520303**



कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
राजर्षी शाहू
र.नं. ८१९
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
१ मे
महाराष्ट्रदिन व कामगार दिन
निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस सुविधा देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
शाहू पे द्वारे कोणत्याही शाखेमध्ये जमा स्लीप किंवा विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून व्यवहार करता येईल.
MAHAVITARAN
MSEB
वीज बिल भरणा केंद्र
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४.'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रू. चे कर्ज वाटप
› शाहू पे
› मोबाईल बँकिंग
› नेट बँकिंग
› डोअरस्टेप बँकिंग
› RTGS
› NEFT
अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था
अखंड वाढ आपल्या गुंतवणुकीची..!
दाम दुप्पट ठेव योजना
सोने तारण कर्ज
वेअर हाऊस कर्ज
अल्पबचत कर्ज
वाहन तारण कर्ज
बचत गट कर्ज
संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
अध्यक्ष राजर्षी शाहू परिवार
राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना
> २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रु.५०,०००/-
सोने तारण कर्ज फक्त
10%
व्याजदरामध्ये उपलब्ध
नियम व अटी लागू
Missed Call
Balance check सुविधा
7877778870
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
Coming Soon
WhatsApp Banking
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com +९१ - ९५२८४९०४९०


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
sales@netwinindia.in
www.netwin.in

# उंच उंच शिखरे गाठती महिला,
# त्यांच्या सन्मानार्थ जनसेवेच्या योजना !




## महिला सन्मान कर्ज सवलत

सर्व कर्ज योजनांवर महिलांना
**व्याजदरात 0.25% सवलत** !
(त्वरा करा, योजना मर्यादित कालावधीसाठी)

* अटी लागू

**संपर्क क्र. - 84 85 87 12 52**

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**


**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.

Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur

We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,


आमच्या विविध कर्ज योजना
सोलर रुफ टॉप पॅनल कर्ज
पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजना
अंतर्गत शासनाची सबसिडी उपलब्ध*
गृह कर्ज
पंतप्रधान आवास योजना (शहरी २.०)
अंतर्गत सबसिडी उपलब्ध*
SUB-KISAN
शेती व शेतीपूरक
कर्ज योजना
शैक्षणिक कर्ज
सोने तारण कर्ज
MSME कर्ज
धन्वंतरी कर्ज
वाहन कर्ज
* नियम व अटी लागू
अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.
मोबाईल : ७८८८००९७१८
Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास
सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली
(शेड्युल्ड को-ऑप. बँक)
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
आपले घरकुलाचे स्वप्न साकार करा आमच्या सोबतीने
गृह कर्ज
व्याजदर:
८० लाखांपर्यंत - ८.२०%*
किमान प्रक्रिया शल्क व जलद प्रोसेसिंग *
अटी व शर्ती लागू*
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.in
KJSBank



आपल्या आकांक्षाच्या क्षितिजाला 'अर्थ' देणारी बँक...
सुवर्णमहोत्सवी
वारणा बँक
सहकारमहर्षि
स्व. तात्यासाहेब कोरे
अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ
मर्या. मुंबई आर्थिकदृष्ट्या मागास अर्थसहाय्य योजना -
व्याज परतावा कर्ज योजना व्याजदर : १२%
✻ शेती संलग्न उद्योग कर्ज योजना
✻ कमर्शिअल वाहन कर्ज योजना
✻ व्यापाराकरिता कर्ज योजना
✻ नवीन व्यवसाय उद्योग कर्ज योजना
✻ गाई-म्हशी गोठा प्रकल्प कर्ज योजना
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास
महामंडळ यांची व्याज परतावा कर्ज योजना -
व्याजदर : १२.००%
✻ कृषीसंलग्न व्यवसाय कर्ज योजना
✻ सेवा उद्योग व्यवसाय कर्ज योजना
✻ पारंपरिक उद्योग व्यवसाय कर्ज योजना
✻ वाहतूक क्षेत्राशी संबंधित व्यवसाय कर्ज योजना
✻ लघु उद्योग व्यवसाय कर्ज योजना
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या
जमाती विकास महामंडळामार्फत कर्ज योजना
वैयक्तिक व्याज परतावा कर्ज योजना
गट व्याज परतावा कर्ज योजना - व्याजदर : १२.००%
वाहन तारण कर्ज
✻ नवीन कमर्शिअल/थ्री/फोर व्हिलर
नवीन दुचाकी व इतर वाहन - व्याजदर : १०.५०%
सौर ऊर्जा कर्ज योजना
✻ (सबसिडी योजना लागू)
व्याजदर - १०.५०%
वास्तू गृहकर्ज योजना
✻ आपली वास्तू गृह कर्ज योजना - व्याजदर : ९.५०%
✻ वारणा शेतकरी गृह कर्ज योजना - व्याजदर : ९.७५%
सोने तारण कर्ज बुलेट रिपेमेंट रु. ४.०० लाख मर्यादा
✻ शेती कारणाकरिता ११%
✻ इतर कारणाकरिता १२%
✻ विविध आकारांची लॉकर सुविधा उपलब्ध ✻
✻ नियम व अटी लागू.
बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा
• डी. मॅट अकौंट सुविधा. • रुपे कार्डद्वारे देशातील कोणत्याही NFS/ATM वरून पैसे काढणे, POS व E-COM सुविधा. • UPI
• RTGS / NEFT सुविधा. • फ्युचर जनराली मार्फत जनरल व लाईफ इन्शुरन्स सुविधा. • एस.एम.एस. व मोबाईल बँकिंग सुविधा
श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर
प्रधान कार्यालय : वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.फोन ०२३२८-२२४२८६/८७ Visit : www.waranabank.com
मोबाईल - कोल्हापूर : ९१४५४६००३०, ९७६३७१६५२०, ८६०५०१८१७८, ९७६३७१६५०१, ८६०५००९०४६. इचलकरंजी व सांगली : ९७६६३९९६४४ / मुंबई : ९७६३७१६१९०


टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
टीजेएस्‌बी सेविंग्स अकाउंट
आता 'कमी' मध्ये मिळवा 'अधिक' सुविधा!!
टीजेएस्‌बी सेविंग्स एलिट अकाउंट
नेहमीच्या बँक खात्यापेक्षा जास्त !
टीजेएस्‌बी सेविंग्स सिल्वर अकाउंट
भविष्याच्या दिशेने एक दमदार पाऊल !
टीजेएस्‌बी सेविंग्स गोल्ड अकाउंट
नातं व्यवहारापलीकडचं !
योजनेचे फायदे
किरकोळ कर्जाच्या व्याजदरात आणि प्रक्रिया शुल्कावर सवलत
मोफत डिजिटल बँकिंग सुविधा
पहिल्या वर्षासाठी लॉकर भाड्यामध्ये सवलत
वैयक्तिक अपघात विमा संरक्षण रु. 2 लाखांपर्यंत
*अटी लागू
www.tjsbbank.co.in | Toll Free : 1800 266 3466 / 1800 103 466

AURO®
SINCE 1948

ISO CERTIFIED ISO 9001 : 2008

BIS Certified
IS : 550 CM/L.No.7200069405
IS : 550 CM/L.No.3740863
IS : 550 CM/L.No.2863066
IS : 550 BIS Certified



SALES & SERVICES
ALL MAHARASHTRA REGION
CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE

Our trusted partners for 75 years

Contact : Mrs. Suvarna Kshirsagar
Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002
mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com
7559283467 I 9685061515 I 9879791521

आपली संस्था

॥ अर्थ सहकारेण कल्याणम् ॥

# जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था मर्या; कराड.

मुख्य कार्यालय : ६७, गुरुवार पेठ, कराड. मोबा. : ९६५७७१९८०१

Email : contact@jankalyankarad.com Visit us : www.jankalyankarad.com




# श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

## सहकार क्षेत्रातील अग्रगण्य बँक

**कोल्हापूर • सांगली • पुणे**

स्थापना :- दि. ०९/११/१९३३ नोंदणी क्र. :- १३२ दि. १०/१०/१९३३

**प्रधान कार्यालय :** श्री भवन, 167 बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर. **फोन :** 2543837, 2541051, 2545587

www.smcbl.co.in ho@smcbl.in smcblbank +91-7720996633

**संचालक मंडळ**

ॲड. राजेंद्र किंकर
श्री. श्रीधर कुलकर्णी
श्री. संदिप कुलकर्णी
इंजि. विनोद डिग्रजकर
डॉ. रुपा नागांवकर
श्री. उदय महेकर
ॲड. अशोक मुंडरगी
ॲड. रघुनाथ लाटकर
सी. ए. केदार हसबनीस
श्री. श्रीकांत हेर्लेकर
श्री. प्रशांत कासार
श्री. कृष्णा काशिद
श्री. नितीन डोईफोडे
सौ. मेघा जोशी

**तज्ञ संचालक**

श्री. भालचंद्र अष्टेकर
श्री. अरुण आराध्ये
श्री. कुबेर भिवटे

**ॲड. रवि य. शिराळकर** — अध्यक्ष
**बी. डी. खरोशे** — प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी
**श्रीमती पद्मजा र. आपटे** — उपाध्यक्ष

।। बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ।।

# अनुक्रम


* **सहकार क्षेत्राच्या सबलीकरणासाठी एकजुटीने काम करण्याची गरज** ...................... १५
* **सहकार चळवळीच्या सक्षमीकरणासाठी ठोस उपाययोजना काँग्रेसने केली नाही – केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची टीका** ...................... १६
* **भारताची अर्थव्यवस्था लवकरच दुसरा क्रमांक गाठणार – मराठे** ...................... १७
* **सहकार चळवळ – काल, आज आणि भविष्यातील!** ...................... १८
* **नागपूर नागरिक सहकारी बँकेत नवा वेतन करार – १७ टक्के वेतनवाढ होणार** ...................... २०
* **यवतमाळ अर्बनच्या वतीने पाणपोई सुविधा** ...................... २१
* **देशातील पहिल्या त्रिभुवन सहकार विद्यापीठाच्या निमित्ताने...** ...................... २२
* **त्रिभुवन सहकार विद्यापीठाचा अभ्यासक्रम त्या त्या राज्यांतील भाषेत शिकविणार – मोहोळ** . २३
* **सहकारी कर्ज व्यवस्थेत अकाउंट ॲग्रीगेटर : बदलाची विचारधारा आणि स्पर्धात्मक संधी** .. २४
* **सांगली सहकार भारती महानगर नूतन कार्यकारणी जाहीर** ...................... २५
* **उस उत्पादन वाढीसाठी एआयचा वापर करणारा नॅचरल शुगर पहिला कारखाना** ...................... २६
* **आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची पुण्यात शाखा सुरु** ...................... २८
* **दहा वर्षे वयाच्या मुला-मुलींची व्यक्तिगत ठेव खाती काढण्याची परवानगी** ...................... २९
* **सहकार भारती प्रशिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी संजय बिर्ला; उपाध्यक्षपदी शरद जाधव** ...... ३०
* **बिगरशेती पतसंस्थांची गुंतवणूक आणि वैधानिक तरलता** ...................... ३१
* **अर्थसिद्धी सहकारी पतसंस्थेचा रौप्य महोत्सव उत्साहात साजरा** ...................... ३२
* **नामांकन पद्धती समजून घेण्याची आवश्यकता** ...................... ३३
* **मनी लॉन्ड्रिंग : पतसंस्थांसाठी जागरुकता व सावधगिरी** ...................... ३४
* **UCBच्या आधुनिकीकरणात क्लाउडची भूमिका** ...................... ३६


## जानेवारी २०२५ पासून 'मॅगझीन पोस्ट' द्वारा वितरण

सहकार सुगंधचा अंक न मिळण्याच्या तक्रारी असल्याने पोस्ट खात्याच्या नवीन मॅगझीन पोस्ट यंत्रणेद्वारे वर्गणीदारांना १००% अंक मिळण्याची खात्री यापुढे राहणार आहे. या मॅगझीन पोस्टचा खर्च अधिक असल्यामुळे नाईलाजाने वर्गणीचे दर वाढवावे लागत आहेत. तरी कृपया वर्गणीदार, वाचक, जाहिरातदार यांनी आवश्यक सहकार्य करून नवीन दराप्रमाणे नोंदणी करावी, ही विनंती. – संपादक


'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक** – भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni


# सहकार सुगंध


ISBN : 978-81-940842-0-4

**मे २०२५ (वर्ष २१, अंक ०२)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)



**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/– फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/– फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने... सहकार क्षेत्रातील योगदान!

१ मे हा महाराष्ट्र दिन. सन १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली आणि त्यानंतर राज्याने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली. त्यापैकी सहकार क्षेत्रात महाराष्ट्राने जे योगदान दिले आहे, ते संपूर्ण देशासाठी दिशादर्शक ठरले आहे. ‘सहकार ही समृद्धीची चळवळ आहे’ ही भूमिका घेऊन महाराष्ट्राने ग्रामीण आर्थिक विकासाचा पाया रचला आहे. सहकार हा एक विचार आहे आणि तो समाजमानसात रुजवण्यासाठी अनेक द्रष्ट्या नेत्यांनी, धुरीणांनी संपूर्ण जीवन व्यतीत केले आहे आणि या विचाराला एक प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. सन १९०४ मध्ये भारतात सहकाराच्या विचारांची मुहूर्तमेढ रोवली गेली. तेथपासून सहकाराचा प्रवास अव्याहतपणे सुरू झाला आहे. महाराष्ट्राने देशाला सहकाराची दिशा दिली आहे, सहकाराची गंगोत्री महाराष्ट्र आहे. एका अर्थाने हा प्रवास म्हणजे दीपस्तंभासारखा आहे. या दीपस्तंभाच्या प्रकाशात दैनंदिन जीवनाशी निगडित असणारी अनेक क्षेत्रे उजळून निघाली. खऱ्या अर्थाने मानवी जीवनाच्या विकासाचे सूत्र गवसले.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात सहकार क्षेत्र हे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचे साधन ठरले. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, खत-विक्री, उत्पादन खरेदी-विक्री यासाठी सहकारी संस्था कार्यरत झाल्या. महाराष्ट्रात राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, लक्ष्मणराव इनामदार, माधवराव तथा अण्णासाहेब गोडबोले यांसारख्या दूरदृष्टीच्या नेत्यांनी सहकाराचा विचार रुजवला, वाढवला, विस्तारला आणि महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाच्या विकासाभिमुख परिवर्तनाला नवीन दिशा दिली. यामधून अनेक सहकारी संस्थांचे जाळे तयार झाले. ‘शेतकरी राजा’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सहकारी साखर कारखाने, पतसंस्था आणि कृषी सेवा सहकारी संस्था यांचे मोठे योगदान राहिले आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी ही भारतासाठी आदर्श ठरली. शेतकऱ्यांचा थेट सहभाग असलेली ही चळवळ शेतीपूरक उद्योग निर्माण करण्यास उपयुक्त ठरली. ‘वऱ्हाडचा दूध व्यवसाय’ असो किंवा ‘जळगावचा दुग्ध संघ’, महाराष्ट्राने दुग्ध उत्पादनातही सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ दिले. आज गोकुळ, वारणा, महानंदा असे कितीतरी दुधसंघ मोठ्या दिमाखात उल्लेखनीय कामगिरी करीत आहेत. अमूलसारखा गुजरातमधील सहकारी दुधसंघ तर आज जगभर सहकाराचे ब्रँडिंग करतांना दिसत आहे. शेतमालाच्या योग्य किमती, वजनमाप व वितरण व्यवस्थेसाठी महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सहकारी मॉडेल देशभर अनुकरणीय ठरले आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मोठे जाळे आज मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक यासारख्या शहरी भागांमध्ये पसरलेले आहे. गृहरचना, गृहनिर्माण क्षेत्रातील ही सहकार चळवळ महाराष्ट्रात प्रभावी ठरली आहे. मुंबई, पुणे, नाशिकसारख्या शहरांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सामान्य नागरिकांना परवडणारी घरे मिळवून दिली आहेत. त्याचबरोबर जिल्हा मध्यवर्ती बँका, सहकारी पतसंस्था, नागरी सहकारी बँका यांनी शेतकऱ्यांना गरजेनुसार वित्तपुरवठा करून त्यांना सावकाराच्या पाशातून मुक्त केले. सहकारातील या आर्थिक संस्था खऱ्या अर्थाने आजही महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या संस्था आहेत.

महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रासमोर आज भ्रष्टाचार, राजकारणाचा हस्तक्षेप आणि कार्यक्षमतेचा अभाव यांसारखी आव्हाने आहेत. मात्र, नव्या पिढीचा सहभाग, तंत्रज्ञानाचा भरपूर वापर आणि पारदर्शक कार्यपद्धतीमुळे या क्षेत्रात नवचैतन्य पुन्हा निर्माण होऊ शकते. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आपण सहकार क्षेत्रातील या ऐतिहासिक योगदानाचा पुनःश्च गौरव केला पाहिजे. ही चळवळ म्हणजे केवळ आर्थिक उपक्रम नाही, तर ती सामाजिक सलोखा, एकोपा आणि लोकसहभागाचे उत्तम असे प्रतिक आहे. महाराष्ट्राने देशाला सहकाराचे एक सक्षम, समृद्ध मॉडेल दिले आहे आणि आता काळाची गरज आहे की, या वारसाला नव्या युगाशी सुसंगत ठेवून पुढे न्यायला हवे. ‘सहकारातून समृद्धी’ हा मूलमंत्र निश्चितपणे प्रत्यक्षात उतरू शकतो, यासाठी तरुणांना या चळवळीत आणायलाच हवे. केंद्र सरकारकडून देखील सहकाराला बळ देण्याचे भरपूर प्रयत्न सुरु आहेत. यामध्ये महाराष्ट्राने अग्रभागी असायला हवे.

जय सहकार!



**संपादकीय...**

# सहकार क्षेत्राच्या सबलीकरणासाठी एकजुटीने काम करण्याची गरज

## सहकार भारतीची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक संपन्न

**नागपूर** – देशाच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राचे मोठे योगदान असून या क्षेत्राच्या सबलीकरणासाठी आपण एकजुटीने कार्य केले पाहिजे, असा सूर सहकार भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. सहकार भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारिणी दोन दिवसीय बैठक रेशीमबाग येथे पार पडली.

राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीच्या उद्घाटन सत्राला सहकार भारताचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष वसंतराव देवपुजारी, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरसिया, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, नागपूरचे आमदार प्रवीण दटके व्यासपीठावर उपस्थित होते. उद्घाटन सत्राची सुरुवात दीप प्रज्वलन व भारत माता तसेच सहकार भारतीचे संस्थापक श्रद्धेय लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली.

देव पुजारी यांनी मनोगतात, सहकार भारतीच्या स्थापनेपासूनचा अनुभव कथन केला. या क्षेत्रात काम करण्यासाठी भरपूर वाव असून येणाऱ्या काळात कार्यकर्त्यांनी झोकून संघटनेचे कार्य केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. आमदार दटके यांनी सहकार भारतीच्या कार्याची प्रशंसा करत या क्षेत्रात सहकार भारती हवा तो चांगला बदल घडवून आणू शकते, असा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रीय महामंत्री चौरसिया यांनी मनोगतातून सहकार भारतीच्या कार्याची माहिती विशद केली. प्रास्ताविक महामंत्री जुगादे यांनी केले.

सहकार क्षेत्राला अधिक बळकटी देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीला देशभरातील २८ राज्यांतून २५० हून अधिक पदाधिकारी सहभागी झाले होते.



**नागपूर येथे नुकत्याच झालेल्या सहकार भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे दीपर्पज्वलन करून उद्घाटन करताना नागपूर आमदार प्रवीण दटके. छायाचित्रात डावीकडून प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, मध्यभागी राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरसिया, माजी राष्ट्रीय अध्यक्ष वसंतराव देवपुजारी, राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी आणि उजवीकडे प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके.**




**सहकार भारताचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष वसंतराव देवपुजारी, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरसिया, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, नागपूरचे आमदार प्रवीण दटके व्यासपीठावर उपस्थित होते.**



# सहकार चळवळीच्या सक्षमीकरणासाठी ठोस उपाययोजना काँग्रेसने केली नाही - केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची टीका



**भोपाळ –** देशातील काँग्रेस पक्ष सरकारच्या कालावधीत सहकार चळवळीच्या सक्षमीकरणासाठी कोणतीही ठोस उपाययोजना अथवा निर्णय झाले नसल्याची टीका केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी येथे केली आहे. येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सहकार परिषदेत ते बोलत होते.

सहकार परिषदेत राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ आणि मध्यप्रदेश राज्य सहकारी डेअरी फेडरेशन यांच्यामध्ये राज्यातील दूध उत्पादन वाढीसाठी करार करण्यात आला. त्यावेळी आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले, गेली अनेक वर्षे सहकार कायद्यात बदल झालेला नाही त्याचा परिणाम सहकार चळवळीच्या विस्तारावर झाला आहे. गेली अनेक वर्षे सहकार चळवळ मंद गतीने पुढे सरकत होती आणि सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालय अस्तित्वात नव्हते. पण मोदी सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली. परिणामी, चळवळीच्या वाटचालीला वेग आला आहे. देशातील काही राज्यात चळवळ गतिमान झाली आहे तर काही ठिकाणी अपेक्षित गती आली नाही.

काही वर्षांपूर्वी केवळ मोठे शेतकरी बीज उत्पादन व्यवसाय करीत होते, असे नमूद करून ते म्हणाले, मात्र आता केंद्र सरकारने अडीच एकर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना ही संधी उपलब्ध करून दिली आहे. बीजांचे संवर्धन आणि प्रचार हा सीड को-ऑपरेटिव्हच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी योग्य किंमत मिळणार आहे. नजीकच्या काळात सहकारी संस्थांसाठी आदर्श उपविधी तयार करण्यात आले आहेत. यामुळे कृषि पतसंस्था सक्षम झाल्या आहेत. तसेच ३०० पेक्षा अधिक सरकारी योजना कॉमन सर्व्हिस सेंटरच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. नजीकच्या काळात या संस्था पेट्रोल पंप चालवू शकतील, असे त्यांनी नमूद केले.

# मोठ्या सहकारी बँकांनी लहान बँकांना मदतीचा हात द्यावा : सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे आवाहन



**सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सहकार सुगंध मासिकाचा गौरव विशेषांक केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना प्रदान करतानाचे छायाचित्र. छायाचित्रात डावीकडून माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. मुकुंद तापकीर, सतीश मराठे, सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतींद्रभाई मेहता.**

**पुणे –** मोठ्या सहकारी बँकांनी लहान बँकांना मदतीचा हात द्यावा, याकरिता केंद्र सरकारच्या मदतीने सहकारी बँकांसाठी स्वतंत्र अम्ब्रेला ऑर्गनायझेशन (राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळ) स्थापन करण्यात आले आहे, त्याचा जास्तीत जास्त फायदा छोट्या सहकारी बँकांनी करुन घ्यावा, असे आवाहन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी येथे केले.

वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेत (व्हॅम्निकॉम) झालेल्या प्रमुख सहकारी बँकांच्या बैठकीत ते बोलत होते. अम्ब्रेला ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष ज्योतिंद्रभाई मेहता, सीईओ प्रभात चतुर्वेदी, सहकार आयुक्त दीपक तावरे, रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे आणि सहकारी बँकांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत सहकारी बँकांना येणाऱ्या अडीअडचणी प्रामुख्याने मांडण्यात आल्या. ज्या सहकारी बँकांना भांडवलाची पूर्तता करण्यात अडचणी येत आहेत, त्यांना भांडवलाचा पुरवठा करणे, कायदेविषयक सल्ला देणे, बदलते तंत्रज्ञान आणि त्यासाठी लागणारे अत्याधुनिक साहित्य, येणारा खर्च यासाठी तजवीज करणे, याबरोबरच बँकांना लागणारे मनुष्यबळ, बँकिंगमधील अनुभवी अधिकाऱ्यांची गरज अशा विविध मुद्द्यांवर बँकांनी मुद्दे मांडले व सूचना केल्या. पीएमसी बँकेमुळे झालेल्या सहकार चळवळीच्या बदनामीचीदेखील चर्चा करण्यात आली. नॉन-शेड्यूल्ड सहकारी बँकांनादेखील सरकारच्या विविध योजनांमध्ये सहभागी करून घेण्याची गरज बोलून दाखवली.

पुणे जनता सहकारी बँक, टीजेएसबी, विश्वेश्वर बँक, डोंबिवली नागरी बँक, कल्याण जनता बँक, पंढरपूर अर्बन बँक, पुणे पीपल्स बँक, बारामती सहकारी बँक, पुणे सहकारी बँक, ओमप्रकाश देवडा पीपल्स बँक, सारस्वत बँक, पिंपरी-चिंचवड सहकारी बँक आदी बँकांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि शहरी समुदायांसाठी सक्षम आर्थिक पर्यावरण निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून स्थापन करण्यात आलेले अम्ब्रेला ऑर्गनायझेशन देशभरातील शहरी सहकारी बँकांना एकत्र आणणारे केंद्रीय संघटन म्हणून कार्य करते आहे, असे ज्योतिंद्रभाई मेहता म्हणाले. या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देणे आणि शाश्वत वाढीसाठी सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# भारताची अर्थव्यवस्था लवकरच दुसरा क्रमांक गाठणार - मराठे

**मुंबई –** भारताची अर्थव्यवस्था सध्या जगात पाचव्या क्रमांकावर आहे आणि येत्या दोन वर्षांत आपण दुसऱ्या क्रमांकावर पोचणार आहोत. अशा स्थितीत फॉरेन्सिक सायन्स आणि अकाऊंटिंग या क्षेत्राची जाण समाजात वाढणे अतिशय गरजेचे आहे. या दृष्टीने फॉरेन्सिक अकाऊंटिंगविषयीची आंतरराष्ट्रीय परिषद महत्त्वाची आहे, असे भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.




येथील चेतना महाविद्यालय आणि शासकीय न्याय साहाय्यक विज्ञान संस्था (होमी भाभा विद्यापीठ) यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या 'फॉरेन्सिक अकाऊंटिंग आर्थिक गुन्हेगारीला प्रतिबंध' या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

मराठे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक शास्त्र विद्यापीठ, इंदोरचे कुलगुरू डॉ. रामदास आत्राम, महाराष्ट्र राज्य फॉरेन्सिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. विजय ठाकरे, फॉरेन्सिक इन्स्टिट्यूटच्या संचालक डॉ. वंदना कांबळे, हेलिक ॲडव्हायझरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुक्मणी कृष्णमूर्ती, चेतना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पं. श्रीदत्त हळदणकर, चेतना मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष डॉ. मधुमिता पाटील, चेतना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय जगताप, फॉरेन्सिक इन्स्टिट्यूटचे प्रा. अमोल देशमुख मंचावर होते.

बीजभाषण करताना पांडे म्हणाले की, सध्या डिजिटल आर्थिक व्यवहारांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. जगात होणाऱ्या एकूण आर्थिक व्यवहारांपैकी ८०% व्यवहार डिजिटल माध्यमातून होत आहेत; त्यापैकी ६७% डिजिटल आर्थिक व्यवहार एकट्या भारतात यूपीआयच्या मार्गाने होत आहेत. एकीकडे डिजिटल आर्थिक व्यवहार इतक्या मोठ्या प्रमाणात होत असताना वाढती सायबर गुन्हेगारी ही एक मोठी समस्या ठरली आहे.

दुर्दैवाने आज भारतात होणाऱ्या एकूण डिजिटल फसवणुकीच्या गुन्ह्यांपैकी ६७% गुन्ह्यांची नोंद होत नाही. लोकांमध्ये सायबर गुन्हेगारीबद्दल अधिकाधिक जागृती झाली पाहिजे.

# वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था संचालकपदी डॉ. एस. के. मोहंती



**पुणे –** वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेच्या संचालकपदाची सूत्रे डॉ. एस के मोहंती यांनी नुकतीच विद्यमान संचालिका डॉ. हेमा यादव यांच्याकडून स्वीकारली आहेत. डॉ. मोहंती यांनी अध्यापन, संशोधन आणि प्रशासकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे देशातील सहकार क्षेत्राच्या वाटचालीत त्यांची महत्त्वाची भूमिका आहे.

भुवनेश्वर येथील कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल टेक्नॉलॉजी विद्यापीठामध्ये स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे संचालक म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. आणंद येथील इन्स्टिट्यूट ऑफ रूरल मॅनेजमेंट संस्थेत सहाय्यक अधिष्ठाता म्हणून काम केले आहे. ही नियुक्ती आगामी तीन वर्षांसाठी असणार आहे.

लोकसभा आणि राज्यसभेत नुकतेच देशातील पहिल्या सहकार विद्यापीठाचे विधेयक मंजूर झाल्यानंतर वैकुंठभाई मेहता संस्थेच्या सहकारविषयक शैक्षणिक उपक्रमास अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने डॉ. मोहंती यांची नियुक्ती महत्त्वाची समजली जात आहे.

# ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरमच्या सल्लागार मंडळावर सुरेश प्रभू यांची नियुक्ती

**नवी दिल्ली –** ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरमच्या सल्लागार मंडळावर माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. सन २०१८ मध्ये फोरमची स्थापना करण्यात आली आहे. मान्यताप्राप्त जागतिक आर्थिक व्यासपीठ म्हणून या फोरमची ओळख आहे.



**सुरेश प्रभू**
**माजी केंद्रीय मंत्री**

जागतिक आर्थिक व्यासपीठ असणाऱ्या संस्थेवर नियुक्त झालेले ते एकमेव भारतीय नागरिक आहेत. प्रभू यांच्याकडे सध्या हरियाणातील ऋषिहुड विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आहेत. तसेच लंडन येथील स्कूल ऑफ इकॉनोमिक्सचे अतिथी प्राध्यापक म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे.

# रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या डीजीएम पदावर पूनम गुप्ता यांची नियुक्ती

**मुंबई –** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या डीजीएम पदावर पूनम गुप्ता यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. बँकेच्या इतिहासात प्रथमच महिला डीजीएम पदावर महिलेची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या त्यांच्याकडे पंतप्रधान मोदी यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्य म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.



नवीन नियुक्ती तीन वर्षासाठी असणार आहे. यापूर्वी त्यांनी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये वरिष्ठ अर्थतज्ञ म्हणून काम पहिले आहे. सध्या त्यांच्याकडे नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च संस्थेच्या महासंचालक पदाची जबाबदारी आहे.

# सहकार चळवळ - काल, आज आणि भविष्यातील!

एक मे २०२५ यादिवशी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६५ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या ६५ वर्षात महाराष्ट्र राज्य हे देशातील एक आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जात आहे. सामाजिक आर्थिक सांस्कृतिक शैक्षणिक या विविध क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सातत्याने प्रगती करून आपला ठसा देशाच्या नकाशावर येऊ उमटवीत आहे. महाराष्ट्र राज्याच्या सहकार चळवळीची प्रगती यासंबंधी काही महत्त्वाची माहिती लेखात आहे.



प्रा. मुकुंद तापकीर
९८२२० २०३३९

महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ ही देशाच्या सहकारी चळवळीचा अविभाज्य घटक आहे. या चळवळीला खूप जुनी पार्श्वभूमी आहे. एकूणच देशातील सहकारी चळवळ शंभर वर्षांनी अधिक काळ सुरू राहिली आहे आणि या सर्व कालखंडात सहकार चळवळीची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती झाल्याचे दिसून येते. चळवळीला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये तत्कालीन ब्रिटिश सरकारच्या लक्षात आले की येथील कृषी व्यवस्थेवर अवलंबित असलेली बहुसंख्य जनता तसेच शेतकरी हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. दुष्काळ शेतीसाठी लागणाऱ्या भांडवलाचा अभाव त्यामुळे इथला बहुसंख्य शेतकरी वर्ग हा आर्थिकदृष्ट्या कंगाल झाला होता. एवढेच नव्हे तर तो सावकारशाही पाशात अडकला होता. घेतलेल्या कर्जाचे दाम दुप्पट पद्धतीने परतफेड करावे लागत होती आणि जर ही रक्कम दिली नाही तर सावकार त्यांच्या जमिनी हडप करत असत. यासंबंधी अनेक वेळेला शेतकरी आपला असंतोष राग ब्रिटिश सरकार समोर प्रगट करीत होत. या गंभीर परिस्थितीवर उपाय करण्यासाठी ब्रिटिश सरकारने शेतकऱ्यांना कशा पद्धतीने कर्ज देता येईल त्यांच्यामध्ये पतनिर्मिती करता येईल यासाठी निकोलसन नावाच्या अधिकाऱ्याची निवड करून त्याला पतनिर्मितीचा अभ्यास करण्यासाठी जर्मनी येथे पाठविले. कारण त्या काळात जर्मनीमध्ये शेतीसाठी लागणाऱ्या कर्ज वितरणाची एक पद्धत विकसित झाली होती. तेथील रायफलशन सोसायटी यांचा पतनिर्मितीचा अभ्यास केल्यानंतर निकोर्शन भारतात परत आले आणि त्यांनी ब्रिटिश सरकारला शेतकऱ्यांच्या सहकारी सोसायटी स्थापन करून कर्ज वितरण केले पाहिजे अशी शिफारस केली.

**❊ सहकार चळवळीचा प्रारंभ –**

या अहवालातील शिफारशींचा गांभीर्याने विचार करून सरकारने १८९६ च्या पुढे शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांच्या सहकारी सोसायटी स्थापनेसाठी प्रोत्साहन देऊन आवश्यक लागणारे भांडवल पुरवण्याची व्यवस्था केली आणि यातूनच भारतातल्या सहकारी चळवळीचा शुभारंभ झाला. छोट्या छोट्या गावातील आर्थिकदृष्ट्या गांजलेले हे शेतकरी एकत्र आले आणि त्यांच्या सहकारी संस्था सुरू झाल्या. यालाच कृषी सहकारी पतसंस्था किंवा विविध कार्यकारी सोसायटी असे नामकरण प्राप्त झाले. या कृषी सहकारी पतसंस्थेत ज्याची आर्थिक ताकद होती. त्यांना सरकारने बीजे भांडवल दिले व त्यातून त्यांना आर्थिक ताकद दिली. या सहकारी संस्थांमधून शेतकऱ्यांना लागणारे शेतीसाठी कर्ज तसेच शेती अवजारे खरेदी करण्यासाठी कर्ज लागले व यातून शेतकऱ्यांना शेती करणे शक्य होऊ लागले व शेतीतून मिळालेल्या कृषी उत्पनातून घेतलेले कर्जाची फेड नियमितपणे करण्याची व्यवस्था सुरू झाली.

**❊ आर्थिक विकासाला चालना –**

भारतातील सहकारी चळवळीमुळे ग्रामीण आर्थिक विकासाला चालना मिळाली. कृषी अर्थव्यवस्था मजबूत करण्यात सहकारी चळवळीचे खूप महत्त्वाचे योगदान आहे. तेव्हापासून महाराष्ट्रात सहकारी चळवळ सुरू झाली आणि आज तिची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती पाहता महाराष्ट्र राज्य हे देशातील सहकारी चळवळीत अग्रेसर राहिले आहे. आज देशभर सुमारे दहा लाखांपर्यंत विविध प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. त्यांची रीतसर सहकारी कायद्याप्रमाणे नोंदणी झाली आहे आणि या सहकारी संस्थांच्या माध्यमातून अंदाजे ३५ कोटी जनता तिचा लाभ घेत आहे. यामध्ये केवळ शेतकरी नाहीत तर शहर भागातील नागरिकांना सहकारी चळवळीचा लाभ मिळत आहे. आज महाराष्ट्रात सुमारे तीन लाखापर्यंत सहकारी संस्थांचे नोंदणी झाले आहे. त्या कार्यरत आहेत आणि चार कोटींपर्यंत नागरिक त्यातून आर्थिक लाभ घेत आहेत. ग्रामीण विकासासाठी सुरू झालेल्या सहकार चळवळीचा विस्तार आणि लाभ ग्रामीण भागापासून शहरी भागातल्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात मिळत आहे. गेली ६५ वर्षात महाराष्ट्रात विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या आहेत. त्यात प्रामुख्याने विविध कार्यकारी सहकारी संस्था, नागरी सहकारी पतसंस्था, नागरी सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, दुग्धविकास सहकारी संस्था मच्छोद्योग, सहकारी संस्था इत्यादी सहकारी संस्थांचे व्यापक जाळे दिसून येते. यातून कोट्यावधी रुपयांची आर्थिक उलाढाल होते व यातून झालेल्या नफ्याचा विनीयोग सामाजिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्राचा विकास करण्यासाठी होत आहे.

**❊ ग्रामीण विकासाला हातभार –**

साखर कारखानदारीमुळे सर्वसामान्य शेतकऱ्याच्या आर्थिक ताकद वाढली आहे आणि ग्रामीण भागातील पुढील पिढी आर्थिक स्थितीमुळे शैक्षणिक प्रगती करू शकते. उदाहरणार्थ पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखाना लोणीसारख्या छोट्याशा खेड्यात सुरू झाला आणि बघता बघता ५०-६० वर्षात या एकट्या कारखान्यामुळे तिथे हजारो विद्यार्थी शालेय आणि महाविद्यालय शिक्षण पूर्ण करू शकले व जीवनात उभे राहिले. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांसारख्या द्रष्ट्या महापुरुषाचे स्वप्न साकार झाले. त्याचप्रमाणे पुढे तात्यासाहेब कोरे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या वारणा सहकारी साखर कारखान्यामुळे विविध उद्योग सुरू झाले. शैक्षणिक संस्था सुरू झाल्या आणि त्याचा लाभ सर्वसामान्य तिथे नागरिक घेताना दिसतच आहे. अशा अनेक सहकारी संस्थांनी ग्रामीण भागाचा कायापालट केला आहे. त्याचे सर्वस्वी श्रेय सहकारी चळवळीलाच दिले पाहिजे. कारण या



पुढील पानावर...



चळवळीमुळे सर्वसामान्य आर्थिकदृष्ट्या क्षमता नसलेल्या नागरिकांना आर्थिक बळ प्राप्त झाले आणि त्यातून त्यांनी विकास केल्याचे स्पष्ट लक्षात येते.

**※ सहकारी संस्थांचे जाळे विस्तारले –**

आज महाराष्ट्राच्या विविध कानाकोपऱ्यात वर उल्लेख केलेल्या संस्थांची जाळे विस्तारलेले आहे. अर्थात हेही स्पष्टपणे जाणवते की, महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास सहकारी संस्थांचे मोठ्या प्रमाणात झाला आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या पट्ट्यात जास्त झाल्याचे दिसून येते. यामध्ये सातारा सांगली कोल्हापूर इत्यादी. त्यामानाने कोकण विदर्भातील काही जिल्हे या चळवळीच्या लाभापासून काही प्रमाणात वंचित झाले असे लक्षात येते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नेतृत्वाचा अभाव. पश्चिम महाराष्ट्रात स्व यशवंतराव, वसंतदादा पाटील, पद्मश्री डॉक्टर विखे पाटील, तात्यासाहेब कोरे यांच्यासारखे दूरदृष्टीचे नेते लाभले आणि त्यांनी पश्चिम महाराष्ट्रात त्यांच्या पुढाकाराने सहकारी चळवळीचे जाळे पश्चिम महाराष्ट्रामध्ये विकसित झाले. अर्थात या चळवळीला महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांनी सहकारी चळवळीला अनुकूल अशी धोरणे अवलंबिली आणि मोठ्या प्रमाणामध्ये सहकारी संस्थांना कोट्यावधीमध्ये अर्थसहाय्य पुरविले. त्यामुळेच मोठ्या प्रमाणावर भांडवल आणि अर्थपुरवठा या सहकारी संस्थांना लागतो, अशा सहकारी साखर कारखाना सहकारी सूतगिरणी सहकारी दुधविकास संस्था यासारख्या संस्था आज महाराष्ट्रामध्ये नावारूपाला आले आहेत. त्याचे श्रेय सहकारी चळवळीचे नेतृत्व आणि सहकारी चळवळीचा विकास झाला पाहिजे, असा आग्रह धरणारे राज्य सरकार याच्याकडे जाते.

**※ प्रशिक्षणाची आवश्यकता –**

सहकारी संस्थांचा कारभार चालविण्यासाठी मोठे मनुष्यबळ कार्यरत आहे. त्यांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे. सहकारी संस्थांची स्थापना आणि त्यांचा कारभार सुरळीत व्हावा, यासाठी प्रत्येक राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही महाराष्ट्र सरकारने निर्माण केलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६१ यातील तरतुदीप्रमाणे किंवा नियमाप्रमाणे चालतो आहे. आज या चळवळीमध्ये हजारो कोटीचे भांडवल व हजार कोटीची उलाढाल होत आहे. त्याचे नियंत्रण करण्यासाठी सहकारी कायद्याची निर्मिती झाली आहे. ही झाली जमेची बाजू. सहकारी चळवळीमुळे काही प्रमाणात आर्थिक विकासाला चालना मिळाले आहे, पण महाराष्ट्रातील आणि देशभरातील सहकारी चळवळीचे यथार्थ मूल्यमापन अनेक तज्ञ मंडळींनी त्याचप्रमाणे वेळोवेळी राज्य किंवा केंद्र सरकारने नेमलेल्या आयोगांनी केले आहे. चळवळीची जशी जमेची बाजू आहे तशी सहकारी चळवळीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हे वास्तव नाकारता येणार नाही. संख्यात्मक प्रगती झाली आहे. सहकारी चळवळीचे इतके विस्तारलेले जाळे अन्य देशात नाही. ते देशात आणि महाराष्ट्रामध्ये आहे, याचा आपल्या सर्वांना सार्थ अभिमान आहे. त्याच वेळेला सहकारी चळवळीला अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. तसेच गुणात्मक विकास पाहिजे तेवढ्या प्रमाणात झालेला नाही, याविषयी माध्यमातून चर्चा होत असते.

**※ चळवळीच्या वाटचालीबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज –**

याचे अनेक कारणे आहेत. त्यामध्ये त्यामध्ये प्रामुख्याने लक्षात येते की, या चळवळीला पाहिजे तेवढे नैतिक अधिष्ठान मिळालेले नाही. कारण अनेक संस्था अकार्यक्षमतेमुळे नफा मिळविताना दिसत नाहीत. वर्षानुवर्षे तोट्यात चाललेल्या यापैकी काही सहकारी संस्था या बंद पडत आहेत. काहींची केवळ नावापुरती नोंदणी झाली आहे आणि त्या बंद पडलेल्या आहेत. हे या चळवळीचे अपयश समजले जाते. अनेक तज्ञांनी याची कारण मीमांसा केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लक्षात येते ते म्हणजे आर्थिक शिस्तीचा अभाव दुसरे म्हणजे कुशल प्रशिक्षित व्यावसायिक दृष्टीचा अभाव तेथील गटबाजी वादावादी सत्ता स्पर्धा आणि स्वार्थी राजकारण अशा घटकांचा विचार केला जातो. अजूनही या चळवळीच्या अपयशाचे कारण म्हणजे संचालकांपासून ते सेवकांपर्यंत प्रशिक्षणाचा अभाव. प्रशिक्षण देण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत, फेडरेशन्स आहेत, असोसिएशन्स आहेत. परंतु काही ठिकाणी ही प्रशिक्षणे कागदावर नोंदणी राहावी, एवढ्यासाठीच करतात की काय असे वाटते, कारण खाजगी क्षेत्रातील व्यावसायिक संस्थांच्या तुलनेमध्ये सहकारी संस्थांचे मनुष्यबळ हे प्रभावी ठरत नाही. हे ठळकपणे दिसून येते. कारण त्या त्या पातळीवर सातत्याने प्रशिक्षण देणे, नवीन कायद्यातील तरतुदींचा परिचय करून देणे, नवीन व्यावसायिक मूल्यांची माहिती देणे, बदलत्या आर्थिक आव्हानांचा अभ्यास करणे आणि व्यावसायिक स्पर्धेमध्ये स्वतःला सिद्ध करणे, याबाबत अनेक सहकारी संस्थांमधील कर्मचारी यांना प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष काम करताना लाभ होत आहे हे अभावानेच जाणवते.

**※ सहकार भारतीची सकारात्मक भूमिका –**

ग्रामीण भागातील सहकारी संस्थांचे संचालक हे त्यांच्या शैक्षणिक कारणामुळे प्रभावी ठरत नाहीत. नोकर भरतीत चालणारी व प्रमोशनमध्ये चालणारा दुजाभाव आणि या चळवळीवर प्रभाव पाडणारा कमालीचा राजकीय हस्तक्षेप यामुळे देशभरात आणि स्वाभाविकपणे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ चांगल्या अर्थाने यशस्वी झाली असे म्हणता येणार नाही. या पार्श्वभूमीवर सहकार भारतीसारखी एक राष्ट्रव्यापी संघटनांवरील नमूद केलेल्या समस्या आणि आव्हाने यावर मात करण्यासाठी कार्यरत आहे. निस्वार्थी मनाने सहकारी चळवळ नैतिकतेच्या पायावर आणि आर्थिक स्थितीवर उभी राहिली पाहिजे, असा सहकार भारतीचा आग्रह आहे. यासाठी एक मिशन हाती घेऊन निस्वार्थी सेवाभाव असणारे हजारो कार्यकर्ते देशभर चालणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये सेवाभाव आणि संस्कारी वृत्तीचा प्रभाव टाकीत आहेत. सहकार भारतीच्या संस्थापकांना असे जाणवले की, या सर्व सहकारी संस्था यशस्वी व्हायचे असतील तर या सहकारी संस्थांमधून संचालकांच्या पासून ते सेवकांच्या पर्यंत उत्तम प्रशिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे, असा आग्रह धरून सहकार प्रशिक्षण केंद्रे देशभर उभे केले आहेत. त्यांना राज्य सरकारांची मान्यता घेतली आहे. आज अशा प्रकारच्या मान्यता प्राप्त प्रशिक्षण केंद्रामधून मोठ्या प्रमाणात संचालकांना आणि सेवकांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. अर्थात सहकार भारतीबरोबरच त्या त्या संस्थांची फेडरेशन किंवा असोसिएशन आता प्रशिक्षणाचा आग्रह धरू लागले आहेत. सहकार भारती या सर्व सहकारी संस्थांच्या कारभारात निस्वार्थीपणा व्यवसायिक मूल्य आणि पारदर्शक कारभार निर्माण व्हावा, यासाठी आग्रह धरीत आहे. त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्रातील आणि देशभरातील चळवळ ही गुणात्मक होईल असा आशावाद सहकार भारतीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना वाटतो आहे. सहकार चळवळीतील विविध संस्थांचे प्रश्न सोडवण्यासाठी सहकार भारतीचे कार्यकर्ते कटिबद्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्याची सहकारी चळवळ ही अधिक व्यापक अधिक गुणात्मक होईल आणि ज्या उद्दिष्टांनी ही चळवळ सुरू केली. त्यांचे स्वप्न भविष्यकाळात नक्की साकार होईल, असा आशावाद व्यक्त करतो.

**– प्रा मुकुंद तापकीर माजी प्रदेशाध्यक्ष, सहकार भारती**

****

# नागपूर नागरिक सहकारी बँकेत नवा वेतन करार - १७ टक्के वेतनवाढ होणार



**नागपूर –** येथील नागपूर नागरिक सहकारी बँकेत नुकताच नवा वेतन करार करण्यात आला असून त्यानुसार कर्मचाऱ्यांना १७ टक्के वेतनात वाढ मिळणार आहे. बँकेचे प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी संघ यांच्यात नुकताच करार करण्यात आला आहे. हा करार ३१ मार्च २०२८ पर्यंत असणार आहे. बँक अध्यक्ष संजय भेंडे यांनी ही माहिती सांगितली.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष पाठक आणि कर्मचारी संघाच्या वतीने विजय खळतकर, संजय रामदे यांनी स्वाक्षरी केली. बँक उपाध्यक्ष अशोक अग्रवाल, तसेच संचालक गिरीश व्यास तुषारकांती डबले तसेच अधिकारी आणि कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अकोला सहकार भारती जिल्हा कार्यकारिणी जाहीर, अध्यक्षपदी रामेश्वर फुंडकर

**अकोला –** सहकार भारती जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी रामेश्वर फुंडकर, तर उपाध्यक्षपदी प्रशांत हजारी, दीपक जोत, जगदीश मूदमकार आणि महामंत्रीपदी जैनेंद्र लुंकड यांची निवड करण्यात आली आहे. सचिव म्हणून दीपक मायी आणि संघटनमंत्री म्हणून संजीव जोशी व खजिनदार म्हणून राजेश शर्मा यांची निवड करण्यात आली आहे. तसेच विविध प्रकोष्ठ प्रमुख आणि सदस्य यांची निवड करण्यात आली आहे.

बैठकीला बँक प्रकोष्ठ प्रमुख शंतनु जोशी, विधी प्रकोष्ठ प्रमुख रामेश्वर खोंड, आदी पदाधिकारी उपस्थित होते. अन्य पदाधिकारी याप्रमाणे – किर्ती भारुका – सहसचिव, नागोराव माहोरे – प्रकोष्ठ समन्वय प्रमुख, मोहन देशमुख – सहकारी दूध प्रकोष्ठ, योगेश पाचडे – पगारदार नोकर, प्रकाश जाधव – सहकारी पतसंस्था प्रकोष्ठ, अमेय कुलकर्णी – सेवा सहकारी सोसायटी, राधिका परचुरे – महिला प्रकोष्ठ प्रमुख, मनीषा कुलकर्णी, नलिनी गावडे – प्रकोष्ठ सहप्रमुख, मंजूषा सोनटक्के, अश्विनी दीक्षित, अर्चना पाटील, जयमाला खेडकर – सदस्य.

जोशी यांनी सांगितले की, सहकार म्हणजे स्वाहाकार हाच समज पूर्वी रूढ होता, तो पुसून काढण्याकरिता सहकार क्षेत्रात काम सुरू केले. सहकार क्षेत्रातील संचालक व कर्मचाऱ्यांवर योग्य संस्कार करून सहकार क्षेत्राचे काम स्वच्छ कसे राहील याचा प्रयत्न केला. विना सहकार नहीं उद्धार, याला नवीन रूप देत बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नही उद्धार हे ब्रीद आणले व सत्यात उतरविले. सहकार भारतीचे काम खूप वाढले असले तरी खूप काम करणे बाकी आहे, सर्वांनी अधिकाधिक वेळ या कामाला द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्ष फुंडकर यांनी सहकार भारतीच्या कार्याची माहिती सांगितली. सूत्रसंचालन योगेश पाचडे यांनी, अधिकाऱ्यांचा परिचय राधिका परचुरे यांनी करून दिला. राजेश शर्मा यांनी आभार मानले.

# राज्यांत मत्स्य व्यवसायासाठी स्वतंत्र प्राधिकरण तयार करण्यात यावे

**नागपूर –** राज्यात मत्स्य व्यवसायासाठी स्वतंत्र प्राधिकरण तयार करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा आणि मासेमारी करणाऱ्या व्यावसायिकांना हेक्टरी २० हजार रुपये कर्जाची उपलब्धता व्हावी, अशी अपेक्षा मत्स्य व्यवसायाचे अभ्यासक प्रकाश लोणारे यांनी व्यक्त केली आहे.

मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाला याबाबत आनंद व्यक्त करून ते म्हणाले, मत्स्य शेतीचे प्रशिक्षण देणारी संशोधन संस्था विदर्भात सुरू करण्यात यावी. तसेच मत्स्य बीज पुरविणारे शासनाचे केंद्र सक्षम करण्यात यावे,व मासेमारीबाबतचे धोरण नक्की करण्यात यावे, याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा असे त्यांनी सांगितले. नैसर्गिक आपत्ती अथवा अतिवृष्टी अथवा अन्य काही कारणांमुळे शेतकऱ्यांना रिलीफ पॅकेज, विमा योजना उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे मत्स्य व्यावसायिकांना मिळणार आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

# बुलडाणा नागरी पगारदार सेवक सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी राधेश्याम चांडक



**बुलडाणा –** बुलढाणा जिल्हा नागरी व पगारदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था संघाच्या व्यवस्थापन समितीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली. संघाचे अध्यक्ष म्हणून राधेश्याम चांडक उपाध्य भाईजी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहाय्यक निबंधक जी. जे. आमले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

बुलडाणा जिल्हा नागरी व पगारदार पतसंस्था संघाची स्थापना ११ मार्च १९९१ रोजी करण्यात आली. संघाच्या ३२० पतसंस्था सभासद आहेत. संघ हा जिल्ह्यातील पतसंस्थांना विविध प्रकारच्या सेवा पुरवीत आहे. भाईजी यांच्या नेतृत्वात संघाने देदीप्यमान कामगिरी करून राज्यामध्ये सर्वोत्कृष्ट संघ म्हणून बुलढाणा जिल्हा पतसंस्था संघाला ओळख निर्माण करून दिली आहे.

संघाचे उपाध्यक्ष म्हणून स्वाती वाकेकर, मानद सचिव म्हणून सुरेन्द्रप्रसाद पांडे यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित संचालक गोविंद मापारी, पंडितराव देशमुख, मंगेश व्यवहारे, मख्खनलाल मुंदडा, स्वाती अनिल कन्हेर, शंकर सकळकर, दीपक देशमाने, सतीश कायंदे आदींची निवड करण्यात आली.

## यवतमाळ अर्बनच्या वतीने पाणपोई सुविधा



**यवतमाळ** – यवतमाळ अर्बन बँकेच्या वतीने शहरातल्या बस स्थानकावर प्रवासी वर्गासाठी पाणपोई सुविधा सुरू करण्यात आली आहे. गेली ७-८ वर्ष बँकेच्या वतीने ही सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

सुविधेचे उद्घाटन बँक अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे यांच्या हस्ते झाले. राज्य ट्रान्सपोर्ट कर्मचारी पतसंस्थेचे संचालक अविनाश दाणी पतसंस्था संचालक रवी सातपुते तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर कोहरे आणि अन्य अधिकारी, संचालक नागरिक उपस्थित होते.

## संस्थेला साधना केंद्र समजून कार्यात झोकून द्या - अरविंद कुकडे




**नवरगाव** – जीवनात जिथं श्रद्धा ठेवायची असते तिथे नम्र व्हावे ही प्रेरणा जगण्याचे बळ देते. मतभेदाला संवादाची जोड मिळाली तर आदर्श कार्याची निर्मिती होते. समाजासाठी जगण्याची तपश्चर्या करण्यासाठी भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्थेसारखी साधना केंद्र दृष्टीपथात येतात तेव्हा संस्थेलाच साधना केंद्र समजून कार्यमग्न व्हा आणि संस्था विकासाच्या पर्यायाने समाज विकासाच्या कार्यात स्वतःला झोकून द्या, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत सहसंपर्क प्रमुख अरविंद कुकडे यांनी सांगितले.

भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्थेद्वारा संस्थेच्या चिमुर शाखा कार्यालय नारायण भवन येथील स्व. नारायणराव तामशेट्टीवार सभागृहात आयोजित संस्थेच्या वार्षिक नियोजन बैठकीत ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, उपाध्यक्ष गोविंद बिसेन उपस्थित होते.

पतसंस्थेच्या ३१ मार्च २०२५ अखेरच्या ठेवी – रु. २४५ कोटी, कर्जे – रु. १८० कोटी, एकूण रु. ४२५ कोटींचा व्यवसाय आणि सुवर्ण तारण कर्ज शून्य टक्के थकित व अन्य सर्व सभासद कर्जे शून्य टक्के एनपीए आहे. संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे यांनी संस्थापक अध्यक्ष स्व. नारायणराव तामशेट्टीवार गुरुजी यांनी घालून दिलेला आदर्श वारसा जोपासणारे आपण सारे पाईक आहोत, याचा विसर पडू न देता सेवारत रहा असे आवाहन केले.

संस्थेचे सहसरव्यवस्थापक दत्ता बहादुरे यांनी मार्च २०२६ अखेर ५०० कोटी व्यवसाय पूर्ततेसाठी मार्गदर्शन करतांना संस्थेचा स्थापने पासूनचा इतिहास विशद केला. भारतमाता पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सूत्रसंचालन अंकुश पुण्यप्रेड्डीवार यांनी तर पसायदानाने सांगता झाली. संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## आदर्श पतसंस्थेच्या व्यवसायात रु. १३४ कोटींची वाढ

**अलिबाग** : जनमानसात पतसंस्थांबाबत अविश्वासाचे वातावरण असताना आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेवर मात्र ग्राहकांचा विश्वास वाढतच आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षांत आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या एकत्रित व्यवसायात रु. १३४ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. आदर्शचा एकत्रित व्यवसाय ७५२ कोटी ७७ लाख रूपयांचा झाला आहे. आदर्शला ७ कोटी ५१ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. निव्वळ एनपीए शून्य टक्के आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील व अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सांगितली.

२०२४-२०२५ या आर्थिक वर्षात आदर्श पतसंस्थेने ७५२ कोटी ७७ लाख रुपयांचा एकत्रित व्यवसाय केला आहे. २०२३-२०२४ या आर्थिक वर्षापेक्षा १३४ कोटी रूपयांनी एकत्रित व्यवसाय वाढला आहे. आदर्शचे वसूल भागभांडवल १८ कोटी ४६ लाख रूपये आहे. आदर्श नागरी पतसंस्थेच्या ठेवी रु. ४३४ कोटी ६६ लाख रूपये आहे. रु. ३१८ कोटी ११ लाख रूपयांचे कर्जवाटप करण्यात आले. रु. १०० कोटी १२ लाख रुपये सोनेतारण व मुदत ठेव तारण कर्ज वाटप करण्यात आले. आदर्शचा स्वनिधी रु. ४७ कोटी ८३ लाख रूपये आहे. वसूल भागभांडवल रु. १८ कोटी ४६ लाख रूपये आहे. रु. १५१ कोटी ३२ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. कर्ज व ठेवीचे प्रमाण (सीडी रेशो) ६६.३५ टक्के आहे. ढोबळ नफा रु.१० कोटी ५० लाख रुपये असून निव्वळ नफा रु. ७ कोटी ५१ लाख रूपये आहे. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या एकूण १९ शाखा आहेत. या सर्व शाखा नफ्यात आहेत. सर्व शाखांच्या व्यवसायात वाढ झाली आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या दोन नवीन शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यापैकी रायगड जिल्ह्याबाहेरील पहिली शाखा वारजे – पुणे येथे सुरू झाली आहे व दुसरी शाखा खोपोली येथे सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी दिली.

## टीजेएसबी बँकेने केला २३ हजार कोटींचा व्यवसाय

**ठाणे** – नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात टीजेएसबी बँकेने २३ हजार कोटींचा व्यवसाय केला आहे तर १४ हजार ८४८ कोटींच्या ठेवी आहेत. तसेच बँकेने ८२७६.१८ कोटींचे कर्जवाटप केले आहे. नफा २५२ कोटींचा मिळविला आहे तर अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ३.५९ टक्के असून निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण शून्य टक्के आहे. बँकेने या वर्षात अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले आहेत.

नवीन कोअर बँकिंग प्रणालीची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. बँकेत सीटिझन को-ऑप. बँकेचे नुकतेच विलीनीकरण करण्यात आले आहे. अशी माहिती बँक अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर, उपाध्यक्ष वैभव सिंगवी तसेच संचालक उपस्थित होते.

# देशातील पहिल्या त्रिभुवन सहकार विद्यापीठाच्या निमित्ताने...

एप्रिल २०२५ मध्ये त्रिभुवन सहकारी विद्यापीठाचे विधेयक संसदेमध्ये मंजूर झाले आणि पहिल्या वहिल्या राष्ट्रीय पातळीवरच्या सहकार विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. सहकारी चळवळीचे अभ्यासक तज्ञ व कार्यकर्ते अशा प्रकारच्या स्वतंत्र विद्यापीठाची सातत्याने मागणी करण्यात येत होती. या संकल्पनेला आता मूर्त स्वरूप येत आहे.



प्रा. मुकुंद तापकीर
९८२२० २०३३९

सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांनी वेळोवेळी सहकार मंत्रालयाला आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्याकडे विद्यापीठाची मागणी केली होती. त्याप्रमाणे सहकार मंत्र्यांच्या पुढाकारामुळे या विद्यापीठाची स्थापना अधिकृतपणे झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सहकार चळवळीचे महत्त्व लक्षात घेऊन दोन वर्षांपूर्वी सहकार मंत्रालयाची स्थापना केली. या चळवळीमध्ये क्रियाशील असलेले अमित भाई शहा यांच्या पुढाकारातून त्रिभुवन सहकार विद्यापीठ देशातील महत्त्वाचे विद्यापीठ ठरणार आहे, अशी अपेक्षा आहे. एकविसाव्या शतकातील सहकारी चळवळ ही जगभरात तसेच देशातही व्यापक स्वरूपाची बनलेली आहे. कोट्यवधी रुपयांची उलाढाल विविध प्रकारच्या सहकारी संस्थांमधून होत आहे. हजारो कर्मचारी या सहकारी संस्थांमधून सेवा देत आहेत. त्यामुळे सहकारी संस्था अधिक व्यावसायिक पद्धतीने चालविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. नवीन व्यवसाय आणि व्यवस्थापन मूल्यांचा आधार घेऊन आगामी सहकारी चळवळ अधिक गतिमान आणि कार्यक्षम होण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर त्रिभुवन सहकारी विद्यापीठ आपली भूमिका पार पाडेल.

विद्यापीठाची स्थापना गुजरातमधील इन्स्टिट्यूट ऑफ रूरल मॅनेजमेंट संस्थेच्या परिसरामध्ये किंवा संकुलात होत आहे. अमूल डेअरीचा विस्तृत परिसर आहे. ही संस्था गेली अनेक वर्षे प्रोफेशनल मॅनेजर तयार करत आहे. नियोजित त्रिभुवन सहकार विद्यापीठात निर्मा संस्था संमेलित झाली आहे. रचनेत आणि अभ्यासक्रमात कोणताही बदल केला जाणार नाही. मात्र ही संस्था त्रिभुवन सहकार विद्यापीठाची अविभाज्य घटक म्हणून काम करील. विद्यापीठाचे नाव 'त्रिभुवन सहकार विद्यापीठ' असे दिले आहे. कारण स्व. त्रिभुवनदास पटेल यांनी सरदार वल्लभभाई पटेल महात्मा गांधी यांच्या प्रेरणेतून खेडा जिल्ह्यात सहभागी दुग्धविकास संस्था शेतकऱ्यांना एकत्र करून सुरू केली होती. पुढे याचे रूपांतर 'आनंद मिल्क युनियन मर्यादित' म्हणजेच अमोल या नावाने जगभर प्रसिद्ध पावलेली ही डेअरी आहे. त्रिभुवनदास पटेल आणि डॉक्टर व्ही वर्ग यांच्या संयुक्त प्रयत्नातून आनंद येथे अमोल डेअरी लक्षावधी शेतकऱ्यांकडून दूध संकलित करून त्यावर प्रक्रिया करून हे दूध देशभर उपलब्ध करून देत आहे. म्हणून या नियोजित विद्यापीठाला श्रीगोंदास पटेल यांचे नाव दिले आहे. हा त्यांच्या कार्याची स्मृती जागवण्याचा प्रयत्न आहे.

संसदेमध्ये या विद्यापीठाचे विधेयक मंजूर करून विद्यापीठाची रचना तसेच त्याचे व्यवस्थापनासंबंधीची तपशीलवार माहिती दिली आहे. कुलगुरू यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाचे कामकाज चालेल. कुलगुरूंची नियुक्ती केंद्र सरकारमार्फत केली जाईल आणि त्यांचा कार्यकाळ तीन वर्षांसाठी असेल. त्यानंतर कुलगुरूंना पुढे दोन वर्षांसाठी त्यांची पुनर्नियुक्ती केली जाईल. केंद्र सरकारने विद्यापीठाचा कारभार चालवण्यासाठी अधिकार मंडळ तयार केले आहे. या अधिकार मंडळाला विद्यापीठाच्या प्रशासनाचे अभ्यासक्रम ठरवण्याचे संबंधित प्राध्यापक निवडीचे अधिकार दिले आहेत. हे अधिकार मंडळ विद्यापीठाचे व्यापक धोरण ठरवतील. विद्यापीठाचे अभ्यासक्रम त्याचप्रमाणे विद्यापीठाचे प्रशासन काढण्यासाठी अधिकारी व अधिकार मंडळ कुलपतींच्या अधिकाराखाली काम करेल. विद्यापीठासाठी केंद्र सरकार मार्फत सहकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीची निवड केली जाईल. त्यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असेल. विद्यापीठाच्या अधिकार मंडळात खालील व्यक्तींचा समावेश असेल ती याप्रमाणे–

१) कुलगुरू २) केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव ३) सहकार मंत्रालयाच्या संबंधित अन्य महत्त्वाच्या मंत्रालयाचे चार सचिव ४) संचालक नाबार्ड ५) संचालक नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड ६) संचालक नॅशनल फिशरी डेव्हलपमेंट बोर्ड ७) सहकार क्षेत्रातील चार तज्ञ व्यक्त असे एकूण १३ सभासदांचे हे विद्यापीठाचे कार्यकारी मंडळ असे असेल. याशिवाय विद्यापीठाच्या कार्याचा भाग म्हणून विविध प्रकारचे अभ्यास मंडळे आणि संस्थांना विद्यापीठाची मान्यता देण्यासाठी विविध मंडळे स्थापन करण्यात येतात.

अशा प्रकारे या नवीन सहकार विद्यापीठाची रचना असेल. आगामी काळात या विद्यापीठामार्फत शिक्षण प्रशिक्षण आणि संशोधन या उद्दिष्टांची पूर्तता केली जाईल. सहकार क्षेत्राचा व्याप लक्षात घेता पुढील पाच वर्षांत १५ ते १७ लाख प्रशिक्षित तरुणांची आवश्यकता असेल हे लक्षात घेऊन आणि काळाची गरज लक्षात घेऊन सहकार चळवळ अधिक बळकट करण्याचा सहकार विद्यापीठ प्रयत्न करेल.

**– प्रा. मुकुंद तापकीर,**
**पुणे माजी प्रदेशाध्यक्ष, सहकार भारती, महाराष्ट्र**

*****

## त्रिभुवन राष्ट्रीय सहकार विद्यापीठाच्या कुलगुरुपदी पद्मश्री डॉ. जे. एम. व्यास



**गुजरात –** आणंद येथील नियोजित पहिल्या त्रिभुवन राष्ट्रीय सहकार विद्यापीठाच्या कुलगुरूपदी ज्येष्ठ न्यायवैद्यक शास्त्रज्ञ आणि पद्मश्री डॉ. जे. एम. व्यास यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गांधीनगर येथील नॅशनल फॉरेन्सिक सायन्स विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची आणि गुजरात फॉरेन्सिक सायन्स विद्यापीठाचे महासंचालक म्हणून जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे. त्यांच्या कार्याची दखल म्हणून त्यांना राष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

# त्रिभुवन सहकार विद्यापीठाचा अभ्यासक्रम त्या त्या राज्यांतील भाषेत शिकविणार - मोहोळ

**पुणे –** देशांतील विविध राज्यात कार्यरत असलेल्या विविध कार्यकारी सहकारी संस्था सक्षम करण्याबरोबर नव्याने स्थापन होणाऱ्या देशातील पहिल्या सहकार विद्यापीठाचा अभ्यासक्रम त्या त्या राज्यांतील भाषेत देण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.

सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक अभ्यासक्रम यावर भर दिला जाणार आहे, असे नमूद करुन ते म्हणाले, यासाठी त्या त्या राज्यांतील संस्थांना संलग्नता दिली जाणार आहे. तसेच जगातील सर्वात उत्तम पद्धतीचा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. आगामी पांच वर्षात सुमारे १७ लाख युवकांची सहकार क्षेत्राच्या वाटचालीसाठी आवश्यकता आहे. यासाठीच सहकार विद्यापीठ कार्यरत असणार आहे.



**केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ**

विद्यापीठातून प्रशिक्षित मनुष्यबळ गरज पूर्ण होऊ शकते. त्या त्या राज्यांतील विविध सहकारी सोसायटी सक्षम करणे, यासाठी २५ विविध प्रकारचे व्यवसाय सुरु करण्यात आले आहेत. आता ४२ हजार सोसायट्या सुरु असून ६८ हजार सोसायट्यांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे.

या सोसायट्यांना आयकर नाही पण रिटन्स भरणे आवश्यक आहे. वैकुंठभाई मेहता ही संस्था नव्याने स्थापन होणाऱ्या त्रिभुवन सहकार विद्यापीठाचा एक महत्त्वाचा भाग असणार आहे, असे एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. ते म्हणाले, साडेतीन वर्षांपूर्वी सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आले. यामुळे सहकार क्षेत्राच्या विस्ताराला गती आली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात त्रिभुवन विद्यापीठाबाबतचे विधेयक संमत झाले आहे. नजीकच्या काळात विद्यापीठ सुरू होईल. त्यासाठीची मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सहकार क्षेत्राच्या विस्तारासाठी आणि या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या युवकांना विद्यापीठाच्या माध्यमातून भविष्याची दिशा मिळू शकणार आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

एनसीडीसीच्या माध्यमातून देशातील सहकार क्षेत्राला १ लाख २८ हजार कोटी निधी देण्यात येणार आहे, असे नमूद करून ते म्हणाले, त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखान्यांना सुद्धा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## सहकारी पतसंस्थांच्या बाबतच्या अंशदानाच्या निर्णयाचा फेरविचार होणार



**कोपरगाव –** राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या बाबतच्या अंशदानाच्या निर्णयाचा फेरविचार करण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईत मंत्रालयात नुकतीच एक संयुक्त बैठक झाली. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, तसेच फेडरेशनचे पदाधिकारी आणि पतसंस्थांचे प्रतिनिधी बैठकीत सहभागी झाले होते.

मागील तीन वर्षांत अंशदान भरण्याबाबत सहकार खात्याने पांच परिपत्रके काढली. मात्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या मंजुरीखेरीज अंशदान न देण्याची भूमिका राज्यातील पतसंस्थानी घेतली होती. त्यामुळे सहकार खाते या निर्णयाचा फेरविचार करणार आहे, असे जाहीर करण्यात आले. पतसंस्थामध्ये असणाऱ्या ठेवींना संरक्षण देण्यासाठी जाहीर करण्यात आलेली अंशदानाची योजना अव्यवहार्य असल्याने रद्द करण्यात यावी अशी मागणी आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केली. सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले की, सोने तारण कर्ज वाढीवर पतसंस्थांनी भर द्यावा, तसेच महिला बचत गटाच्या वतीने तयार करण्यात येणाऱ्या वस्तूंची विक्री पतसंस्थांनी करण्यास हरकत नसल्याचे त्यांनी जाहीर केले. फेडरेशनच्या वतीने तयार करण्यात आलेली क्रास प्रणाली सक्तीची करण्याबाबत बैठकीत एकमत झाले आहे. फेडरेशन अध्यक्ष कोयटे यांनी सांगितले की, सहकार खात्याकडून १०१ चे दाखले तातडीने देण्यात यावेत, राज्यातील काही पतसंस्थांना कमकुवत संस्था म्हणून जाहीर करण्यात आले होते. हा निर्णय रद्द करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## त्रिभुवन सहकार विद्यापीठामुळे सहकार चळवळीला चालना मिळणार - संघानी

**पुणे –** त्रिभुवन सहकार विद्यापीठामुळे सहकार चळवळीला चालना मिळणार आहे आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत, असे मत इफ्कोचे अध्यक्ष दिलीप संघानी यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणाले, देशातील सहकार चळवळीला नवीन दिशा मिळणार आहे. तसेच केवळ सहकारी शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षणाला प्रोत्साहन मिळेल आणि सहकार चळवळ व्यावसायिकदृष्ट्या सक्षम होण्यास हातभार लागणार आहे.



केंद्रातील सरकार विकसित भारत २०४७ या ध्येयाकडे वाटचाल करीत आहे. यामध्ये सहकार क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकणार आहे. विद्यापीठाचे अभ्यासक्रम हे व्यावहारिक आणि रोजगाराभिमुख असतील. त्यामध्ये सहकारी व्यवस्थापन, सहकारी वित्त आणि बँकिंग डिजिटल सहकारी संस्था सामुदायिक विकास आणि सहकारी संस्था, कृषि आणि ग्रामीण सहकारी संस्था व ग्रामीण सहकारी संस्था यांचा समावेश असणार आहे, असे ते म्हणाले.

## राज्य सहकारी बँकेच्या सरव्यवस्थापकपदी सायली भोईर


**पुणे –** राज्य सहकारी बँकेच्या सरव्यवस्थापक म्हणून सायली एस. भोईर यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनमध्ये त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सचिव म्हणून तसेच नागरी बँकिंग क्षेत्रात अनेक वर्ष अधिकारी पदावर काम केले आहे. शासनाच्या विविध समित्यांवर काम केले आहे.



# सहकारी कर्ज व्यवस्थेत अकाउंट ॲग्रीगेटर : बदलाची विचारधारा आणि स्पर्धात्मक संधी

सहकारी बँका अनेक वर्षांपासून सामान्य लोक, लघुउद्योग आणि ग्रामीण व निमशहरी भागातील उद्योजकांना आधार देत आहेत. याबद्दल आधीच्या लेखांकांमध्ये आपण पाहिले.

उत्पादन, सेवा, शिक्षण, बाजारपेठ अशा १८हून अधिक क्षेत्रात या बँका सक्रिय आहेत. जगभरातील अनेक देशांतील बँका डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून जलद, पारदर्शक आणि प्रभावी कर्जवाटप करत आहेत.



अजित भाले
८००७७ ५५४५५

लेखांक ४

भारतातील सहकारी बँकांनाही आता अतिशय काळजीपूर्वक आणि सकारात्मकरीत्या याच दिशेने पावले उचलणे आत्यंतिक गरजेचे आहे.

**• डिजिटल कर्जवाटपाची गरज काय? तंत्रज्ञान यात उपयुक्त ठरेल का?**

आजकाल बँका ग्राहकांना ऑनलाइन माध्यमातून आणि कमी वेळ घेऊन कर्ज देत आहेत. यामुळे ग्राहकांना चांगल्या सेवेचा अनुभव येतो आणि बँकेचा व्यवसाय देखील वृद्धिंगत होतो आहे.

सहकारी बँकांनीदेखील केवळ त्यांच्या शाखेच्या परिसरापुरता मर्यादित व्यवसाय न करता, डिजिटल माध्यमातून नवीन सदस्य जोडण्याची आणि विश्वासार्ह आणि नवोदित सेवा देण्याची संधी घ्यायला हवी.

तंत्रज्ञान यात मोठे योगदान देऊ शकते. घर्षणरहित सेवा ज्यात अशी व्यक्ती किंवा व्यवसाय ज्यांना स्वतःचा आर्थिक लेखाजोखा नीटपणे मांडता येत नाही, त्यांच्या आर्थिक सामाजिक आणि तांत्रिक त्रुटी समजावून सांगण्याची समज नाही. नागरी भागात, मोठ्या बँका भाषेच्या उणिवा संवाद मर्यादित होण्याने त्यांना बऱ्याच सेवांना मुकावे लागत असे. अशा तंत्रज्ञान आणि अकाउंट अग्रीगेटर ही व्यवस्था तुमच्या आर्थिक समावेशनासाठी महत्त्वाची ठरू शकते.

**• अकाउंट ॲग्रीगेटर म्हणजे नक्की काय?**

अकाउंट ॲग्रीगेटर (AA) ही एक RBI मान्यताप्राप्त प्रणाली आहे, ज्यामध्ये ग्राहकांची संमती घेतल्यावर, त्यांची आर्थिक माहिती बँकेला मिळवता येते. ही माहिती सुरक्षित आणि एका ठराविक स्वरूपात मिळते. - तीही थेट ग्राहकाच्या बँक, विमा, कर, गुंतवणूक अशा विविध खात्यांमधून. यामुळे

❊ **सदस्य ओळख अचूक होते** – आर्थिक फसवणुकीचा धोका कमी होतो.

❊ **संपूर्ण आर्थिक माहिती एका ठिकाणी सहमतीनेच मिळते** – नियमांशी सुसंगत राहता येते.

❊ **क्रेडिट स्कोअर नसलेल्या लोकांनाही कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होतो** – आर्थिक वर्तनावर आधारित निर्णय घेता येतात.

**• अकाउंट अग्रीगेटर (AA) चे सहकारी बँकांना काय फायदे होतात?**

❊ **RBI सारख्या नियामकांशी सुसंगती राखता येते** – डेटा एकसंध असल्याने लेखापरीक्षण सोपे होते.

❊ **बँकांना नवीन कर्ज उत्पादने तयार करता येतात** – ग्राहकाच्या सर्व आर्थिक घडामोडी पाहून.

❊ UPI chya **नवयुगातील ग्राहकांनाही सेवा देता येतात** – क्रेडिट हिस्टरी नसली तरीही आर्थिक व्यवहारांच्या तपासणीवरून अधिक विश्वासाने त्यांना कर्जसेवा देता येतात.

**• काही अडचणी व गैरसमज –**

❊ काही सहकारी बँकांना वाटू शकते की, AA प्रणाली वापरली तर त्यांच्या ग्राहकांची माहिती इतर बँकांना मिळेल आणि ग्राहक सहजतेने त्यांच्याकडून निघून दुसऱ्या चांगल्या बँकेकडे व्यवहारासाठी जातील. पण वस्तुस्थिती तशी नाही.

❊ वास्तविकरीत्या AAच्या वापराने सहकारी बँकांना डिजिटल व्यवहारात सहभागी होऊ शकता येणार आहे. किंबहुना या नवयुगात त्यांना तसे सहभागी व्हावेच लागणार आहे.

❊ AA च्या वापराने व्यवहारातील पारदर्शकता वाढते आणि अशा बँकांवर नियामकांचा विश्वास अधिक असतो.

❊ डिजिटल माध्यमातून नवीन ग्राहक जोडता येण्याची प्रक्रियाही सुकर होते.

AA प्रणालीयुक्त डिजिटल कर्ज व्यवस्थेत NPA चे काही दुवे लवकर शोधण्याची प्रकियाही सुकर बनते. नजिकच्या काळात AA भारतीय बँकांच्या सद्य कर्जव्यवस्थेला मोडीत काढत नवीन कमी कागदोपत्राची, शासकीय नियमांच्यानुसार कर्जदाराचे मूल्यांकन करणारी, आणि साधारणपणे एकाच प्रकाराने कर्जप्रकरणे हाताळणारी कर्ज व्यवस्था पुढे आणणार आहे. तेव्हा सहकारी बँकांनी AAकडे फक्त तांत्रिक बाब किंवा तंत्रज्ञान म्हणून न बघता एक बँकेचे वाढत्या अर्थव्यवस्थेतील स्थान म्हणून बघण्याची आवश्यकता आहे.

**• त्यामुळे येत्या काळात सहकारी बँकेसाठी काही प्रश्न आपसुकच महत्त्वाचे ठरतात.**

❊ सहकारी बँकांचा वाढीचा दृष्टिकोन काय आहे?

❊ त्या डिजिटल भारतात कशा सामील होणार?

❊ मानवतावादी सेवा टिकवून ठेवून तंत्रज्ञानाचा वापर कसा करणार?

❊ बहुराज्य परवाना मिळवण्यासाठी काय पावलं उचलणार?

❊ ग्रामीण व निमशहरी डिजिटल ग्राहकांसाठी तयार आहेत का?

या प्रश्नाच्या साकारात्मक उहापोहामधून, अकाउंट अग्रीगेटर या प्रणालीच्या अवलंबाने सहकारी बँकांसाठी अद्ययावत टेक्नॉलॉजी वापरसाहित काही सहकारी क्षेत्रासाठीचे मुद्दे अबाधित ठेवून assisted services, मदतशील यंत्रणा तयार करण्याच्या शक्यता निर्माण होतात.

अकाउंट अग्रीगेटर प्रणाली सहकारी बँकांना नव्या युगातील कर्जवाटपासाठी एक मजबूत पाया देते. ही प्रणाली स्वीकारली, तर बँका पारदर्शक, विश्वासार्ह आणि डिजिटल सेवा देऊ शकतात. यामुळे त्या फक्त स्थानिक बँका न राहता, आधुनिक आणि स्पर्धात्मक व जागतिक दर्जेच्या आर्थिक संस्था बनतील. AA चा वापर सहकारी बँकांना, प्रगतशील बँकांच्या रांगेत नेऊन उभे करण्यास कारणीभूत ठरणार आहे ही काळ्या दगडावरची रेघ!

**– अजित भाले,**
**संस्थापक, मेट्टारेव सिस्टीम्स, पुणे**
Mettarev Systems ajit.bhalemettarev.com

❊❊❊❊❊

# सांगली सहकार भारती महानगर नूतन कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी शशिकांत राजोबा, महामंत्रीपदी शैलेश पवार, संघटन प्रमुखपदी संदीप कुलकर्णी




**सांगली** – सांगली महानगर सहकार भारती अध्यक्षपदी शशिकांत राजोबा, महामंत्रीपदी शैलेश पवार, संघटन प्रमुखपदी संदीप कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. प्रमुख पाहुणे म्हणून सहकार भारतीचे प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव, सांगली अर्बन बँकेचे अध्यक्ष आणि सहकार भारतीचे प्रदेश कोषाध्यक्ष गणेश गाडगीळ, प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, विभाग प्रमुख चंद्रकांत धुळप होते.

ग्रामीण अध्यक्ष सुमंत महाजन, महानगर अध्यक्ष शशीकांत राजोबा, तासगाव अर्बनचे अध्यक्ष महेश्वर हिंगमिरे, सहकार भारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाषचंद्र मालाणी यांची उपस्थित होते. प्रास्ताविक महानगर अध्यक्ष शशीकांत राजोबा यांनी केले. गणेशराव गाडगीळ, संजय परमणे, शरद जाधव यांनी मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख चंद्रकांत धुळप यांनी नूतन कार्यकारिणी जाहीर केली. नूतन पदाधिकार्यांचा सत्कार करणेत आला.

कार्यकारिणी खालील प्रमाणे महामंत्री शैलेश पवार, संघटन प्रमुख संदीप कुलकर्णी, उपाध्यक्ष – किशोर शहा, अनिल मगदूम, श्रीकांत मगदूम, सचिव – एडव्होकेट अमोल बोळाज, सहसंघटन प्रमुख – सुषमा कुलकर्णी, महिला प्रमुख-उत्कर्षा लाडे, महिला सहप्रमुख – स्वाती सावळवाडे, कोषाध्यक्ष – बाळासाहेब खुडे, बँक प्रकोष्ठ प्रमुख – सागर घोंगडे, सहप्रमुख सागर बिरनाळे, अनिल बिरजे, पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख – एन. जे. पाटील, सहप्रमुख – धीरज नसलापुरे, पगारदार पतसंस्था प्रमुख – सतीश सावंत, सहप्रमुख – धनाजी हेगडे, ग्राहक संस्था प्रकोष्ठ प्रमुख – श्रुती जोशी, सहप्रमुख पृथ्वी कांबळे, गृहनिर्माण प्रकोष्ठ – एडव्होकेट मंदार देशपांडे, सहप्रमुख श्रीशैल्य कोठावळे, बचतगट प्रकोष्ठ संपदा आरवाडे, सहप्रमुख गीतांजली टेके, विकास सोसा. प्रकोष्ठ सुरेश गायकवाड, सहप्रमुख शशिकांत चौगुले, मत्स्य प्रकोष्ठ प्रमुख अतुल बावधनकर, साखर कारखाना प्रकोष्ठ मधुकर पाटील, सनदी लेखापाल प्रकोष्ठ प्रमुख सी.ए. सलील लिमये, विधी प्रकोष्ठ प्रमुख सुनेत्रा रजपूत, आय.टी. प्रकोष्ठ प्रमुख मोहित डुबल, प्रसिद्धी प्रमुख अवधूत ठोके, ऑडिटर प्रकोष्ठ प्रमुख सुरेश कोरे, मल्टीस्टेट प्रकोष्ठ परशराम कदम, सदस्य अण्णासाहेब पाटील, कुमार पाटील, वसंत सूर्यवंशी, अशोक जाधव, सी.एस. कुलकर्णी, महानंदा शेटे. यावेळी ग्रामीण कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती सावळवाडे यांनी केले. आभार भारत निकम यांनी मानले.

## सहकार भारती प्रदेश संघटक शरद जाधव यांचा चौंडेश्वरी पतसंस्थेच्या वतीने सत्कार

**आटपाडी, सांगली** – सहकार भारती प्रदेश संघटक शरद जाधव यांचा सहकार भारती आटपाडी तालुका व चौंडेश्वरी पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

चौंडेश्वरी पतसंस्थेचे प्रमुख व सहकार भारतीचे तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत भाऊ दौंडे तालुका अध्यक्ष बाबासाहेब माळी, पतसंस्थेचे अध्यक्ष राहुल सपाटे, उपाध्यक्ष योगेश रणदिवे, सांगली जिल्हा ग्रामिणचे उपाध्यक्ष सतीश भिंगे, ज्ञानेश्वर राक्षे, सर्जेराव राक्षे, जीवन पोळ, कोल्हापूर विभाग संघटक चंद्रकांत धुलप, राजाभाऊ कुलकर्णी इत्यादी पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते. तसेच दत्तात्रय स्वामी, तुकाराम जाधव, बालक डोईफोडे, महेश चांदवले, सतीश साळुंखे, संजय तारळेकर, विविध पतसंस्थांचे सचिव उपस्थित होते.

## सोलापूर जिल्हा सहकार भारतीच्या अध्यक्षपदी किरण करकमकर



**सोलापूर** – सोलापूर जिल्हा सहकार भारतीच्या अध्यक्षपदी किरण करकमकर यांची नुकतीच निवड करण्यात आली.

तसेच दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराने नाशिक पत्रकार संघाच्या वतीने करकमकर यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्रदान करून यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्याबद्दल करकमकर यांचा विविध संस्था व संघटना यांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# उस उत्पादन वाढीसाठी एआयचा वापर करणारा नॅचरल शुगर पहिला कारखाना




बी. बी. ठोंबरे

**रांजणी –** ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा एआय वापर करणारा नॅचरल शुगर हा पहिला साखर कारखाना ठरला आहे, अशी माहिती नॅचरल उद्योग समुहाचे अध्यक्ष आणि कृषिरत्न बी. बी. ठोंबरे यांनी येथे सांगितले. समुहाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

उसासाठी एआयचा वापर आणि उन्हाळ्यातील ऊस पीक संगोपन हा परिसंवादाचा विषय होता. विशेषज्ञ डॉ. विवेक भोईटे, कृषिरत्न डॉ. संजीव माने, शास्त्रज्ञ डॉ. बाळकृष्ण जडे आदी वक्ते उपस्थित होते. ठोंबरे म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे ऊसाच्या उत्पादनात ३० टक्के वाढ होते आणि खर्च २५ टक्के कमी होण्यास मदत होते. येत्या ऊस लागवड हंगामासाठी समुहाच्या वतीने किमान एक हजार शेतकऱ्यांच्या शेतात या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

डॉ. भोईटे यांनी एआय तंत्रज्ञानविषयी सविस्तर माहिती सांगितली, तर डॉ. जडे यांनी मका पिकाबाबत माहिती सांगितली. डॉ. माने यांनी एकरी १०० टन उत्पादन घेण्यासाठीचे तंत्रज्ञान याची माहिती सांगितली. पांडुरंग आवाड यांनी सूत्रसंचालन आणि किशोर डाळे यांनी आभार मानले.

# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्यालय प्रशस्त होणार

**पुणे –** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्यालय नजीकच्या काळात आणखी प्रशस्त होणार असून बँकेने नव्याने जागा विकत घेतली असून त्या ठिकाणी बँकेची विविध कार्यालये सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती सांगण्यात आली.

बँकेची व्यावसायिक उलाढाल मोठ्या प्रमाणावर वाढली असून सध्या २८ हजार कोटींपेक्षा अधिक झाली आहे. बँकेने ५१ हजार रुपयांच्या खेळत्या भांडवलावर कामकाज सुरू केले होते. पण त्यामध्ये टप्याटप्याने वाढ होत गेली. वाढत्या व्यापामुळे बँकेला आणखी जागेची गरज भासू लागली. त्यामुळे बँकेने नव्याने जागा घेतली आहे. नजीकच्या काळात नवीन जागेत बँकेच्या कार्यालयाचा विस्तार करता येणे शक्य होणार आहे, अशी माहिती बँक संचालक रमेश थोरात यांनी सांगितली.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अडीच हजार कोटींचे पीककर्ज उद्दिष्ट

**पुणे –** आगामी खरीप हंगामासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सुमारे अडीच हजार कोटींचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठरविले आहे. बँक अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी ही माहिती सांगितली. गेल्या वर्षी बँकेला २ हजार ४३ कोटी ४३ लाख इतके उद्दिष्ट देण्यात आले होते. बँकेने प्रत्यक्षात ११२.३३ टक्के पीक कर्ज वाटप पूर्ण केले आहे. बँक खरीप आणि रब्बी हंगामासाठी कर्जाची उपलब्धता करते. चालू वर्षासाठी पीक कर्जाचा वार्षिक पतआरखडा जिल्हानिहाय नजीकच्या काळात अंतिम करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जागतिक स्तरावरील गुणवत्ता व्यवस्थापन आणि ऊत्कृष्ट कार्य प्रणालीसाठी आयएसओ मानांकन मिळाले आहे. बँक मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी ही माहिती सांगितली.

## नांदणी सहकारी बँकेच्या ठेवीमध्ये लक्षणीय वाढ

**जयसिंगपूर, कोल्हापूर –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात नांदणी सहकारी बंकेला ४ कोटी ८ लाख रुपयांचा नफा झाला असून ठेवींमध्ये लक्षणीय वाढ होऊन त्या ३३४ कोटी १४ लाख इतक्या झाल्या आहेत. बँकेने शून्य टक्के एनपीए परंपरा राखत असल्याची माहिती बँक अध्यक्ष अप्पासाहेब लठ्ठे यांनी सांगितली. बँकेचे भाग भांडवल १३ कोटी ९ लाख झाले असून राखीव निधी २४ कोटी ९६ लाख इतका झाला आहे. बँकेने विविध योजनेत १३० कोटी ७६ लाख रुपये इतकी गुंतवणूक केली आहे. बँक ठेवीत ४० कोटी रुपये इतकी वाढ झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

## आजरा अर्बनला ९ कोटी ८२ लाख ढोबळ नफा

**आजरा कोल्हापूर –** येथील आजरा अर्बनला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ९ कोटी ८२ लाख इतका ढोबळ नफा झाला आहे तर बँकेच्या ठेवीत १२६ कोटी ६६ लाख रुपयांची वाढ झाली असून एकूण ठेवी १०२५ कोटी इतक्या झाल्या आहेत. बँकेचा मिश्र व्यवसाय १६८१ कोटी ५२ लाख इतका झाला आहे. बँक अध्यक्ष अशोक चराटी यांनी ही माहिती सांगितली. कर्नाटक, मुंबई कोल्हापूर येथे बँकेने नवीन शाखा सुरू केल्या आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेकविध योजना बँकेने राबविल्या आहेत.

## श्री आर्य चाणक्य सहकारी पतसंस्थेला ३.७५ कोटी नफा

**इचलकरंजी –** येथील श्री आर्य चाणक्य सहकारी पतसंस्थेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ३.७५ कोटी नफा झाला असून ३७२ कोटी रुपयांचा मिश्र व्यवसाय केला आहे. संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र राशिनकर यांनी ही माहिती सांगितली. संस्थेकडे २२२ कोटीच्या ठेवी झाल्या असून १५० कोटी कर्ज वाटप केले आहे, असे ते म्हणाले.

## बुलढाणा अर्बन व्यवसायात २००० कोटींची वाढ

**पुणे –** येथील बुलढाणा अर्बन सोसायटीने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात २३ हजार ५०० कोटींचा व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. संस्थेने वर्षभरात व्यवसायात २ हजार कोटींची वाढ केली असून आर्थिक वर्षात संस्थेला ६१ कोटींचा नफा झाला आहे. संस्थापक अध्यक्ष राधेशाम चांडक यांनी ही माहिती सांगितली. संस्था अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यावेळी उपस्थित होते. संस्था ग्राहकांच्या हितासाठी आणि त्यांना सर्वात उत्तम सेवा देण्यासाठी कार्यरत आहे. देशातील सर्वात मोठी विश्वसनीय संस्था म्हणून नावलौकिक आहे. विविध योजना आणि उपक्रमाच्या माध्यमातून संस्था ग्राहकांशी जोडली गेली आहे. येणाऱ्या काळात संस्था प्रगतीचा वेग कायम राखेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**




# सहकार महर्षी

**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ – प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | – | रु. १५००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | – | रु. १३५०/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | – | रु. १२००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला **QR** कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
  शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

# आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची पुण्यात शाखा सुरु




**अलिबाग –** आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने पुणे शहरातील वारजे येथे शाखा सुरू केली आहे. रायगड जिल्ह्यात आदर्शच्या एकूण १८ शाखा आहेत. आदर्शने १९ वी शाखा पुणे शहरात सुरू केली. शाखेचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले.

सहकार व बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, जनता सहकारी बँकचे अध्यक्ष रविंद्र हेजीब, माजी नगरसेवक प्रदीप धुमाळ, किरण बारटक्के, माजी नगरसेविका वृषाली चौधरी, पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील, पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, उपाध्यक्ष कैलास जगे, संचालक सतीश प्रधान, विलाप सरतांडेल, ॲड. रेश्मा पाटील, ॲड. वर्षा शेठ, रामभाऊ गोरीवले, महेश चव्हाण, संजय राऊत, सीए डॉ. मकरंद आठवले तसेच संस्थेचे मार्गदर्शक व कंसल्टंट नितीन वाणी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील आदी उपस्थित होते.

पतसंस्थेचे काम नावाप्रमाणे आदर्श आहे. पतसंस्थेची आर्थिक स्थिती भक्कम आहे. कोकणातील पतसंस्था पुण्यात शाखा सुरू करते हे कौतुकास्पद आहे, असे अनास्कर यांनी सांगितले. पतसंस्थेचे कार्यक्षेत्र रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई, पुणे या जिल्ह्यामध्ये आहे. सन २०३५ पर्यंत ३९ शाखा सुरू करण्याचा मानस संचालक मंडळाचा आहे. मार्च २०२६ पर्यंत एकत्रित व्यवसाय एक हजार कोटी करण्याचे उद्दिष्ट आहे, असे अध्यक्ष पाटील यांनी सांगितले. संस्थापक पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी पतसंस्थेच्या प्रगतीचा आढावा सांगितला. तसेच पुणे शहरात पतसंस्थेची शाखा सुरू करण्यामागचा उद्देश सांगितला. उपाध्यक्ष कैलास जगे यांनी आभार तर मुख्याधिकारी उमेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.




## महिला संचालकांसाठीच्या प्रशिक्षण उपक्रमास उस्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर –** कर्मवीर मल्टिस्टेट पतसंस्था जिल्ह्यातील शिरोळ तालुका सहकारी संस्थेतील महिला संचालकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी झाला. सहकार भारती प्रदेश संघटक शरद जाधव, कोल्हापूर विभाग संघटक चंद्रकांत धुळप व पदाधिकारी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सहकार भारती कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष अरविंद मजलेकर होते.

कोल्हापूर जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रिया दळणर उपस्थित होत्या. सहकार भारती महिला प्रमुख वैशाली आवाडे यांनी सहकार भारतीचे कार्य व महिलांचा विकासातील सहभाग या विषयावर मार्गदर्शन केले. प्रदेश संघटक जाधव यांनीही महिलांचे समाजातील स्थान यावर मनोगत व्यक्त केले.

दुपारच्या सत्रात पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख सागर चौगुले यांनी महिलांचा व्यक्तीमत्व विकास यावर तर ऑडिटर्स कौन्सिलचे विश्वस्त व कोल्हापूर जिल्हा महामंत्री श्रीकांत चौगुले यांनी लेखापरीक्षण व ऑडिट गुणपत्रिकेचे तपशीलवार विवेचन केले. सहकार भारती विभाग सहसंघटक जवाहर छाबडा यांनी एनपीएबाबत विवेचन केले. साने गुरुजी पतसंस्था अध्यक्ष सुरेखा कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. संघटक सागर हुपरे यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. सहसंघटक संजय सातपुते यांनी आभार मानले. प्रशिक्षण कार्यक्रमास ६० महिला संचालक उपस्थित होत्या.

## एसव्हीसी बँकेची पुण्यात १९९ वी शाखा सुरु

**पुणे –** येथील एसव्हीसी को-ऑपरेटिव्ह बँकेने पुण्यात १९९ वी शाखा सुरु केली आहे. बँकेचे संचालक सुनील गोकर्ण यांच्या हस्ते नवीन शाखेचे उद्घाटन करण्यात आले. चाकण येथे ही शाखा कार्यरत झाली आहे. यावेळी बँकेचे संचालक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# दहा वर्षे वयाच्या मुला-मुलींची व्यक्तिगत ठेव खाती काढण्याची परवानगी

रिझर्व बँक ऑफ इंडियाने नुकतेच एक परिपत्रक काढून दहा वर्षे वयाच्या वरील मुला-मुलींची व्यक्तिगत खाती उघडण्याची नागरी सहकारी बँकांना परवानगी दिली आहे.



**डॉ. अभय मंडलिक**
९४०३० ८०७२५

शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनींना स्वतंत्रपणे बँकिंग व्यवहार समजावेत, करता यावेत या हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे. या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांची व्यक्तिगत खाती उघडून घेऊन नागरी सहकारी बँकांना आपला व्यवसाय वाढवता येईल.

कासा (CASA) ठेवी वाढविण्याची नवीन संधी नागरी सहकारी बँकांना यानिमित्ताने मिळाली आहे. या बाबतीतला अन्य तपशील याप्रमाणे –

१) दहा वर्षाच्या आतील मुला-मुलींसाठी पूर्वीप्रमाणेच त्यांच्या पालकांच्या समवेत अज्ञान पालनकर्ता या पद्धतीने खाती उघडता येऊ शकतील.

२) ज्या मुला-मुलींचे वय दहा वर्षापेक्षा जास्त आहे, अशा मुला-मुलींना स्वतंत्रपणे बचत आणि ठेव खाते उघडता येईल, असे रिझर्व बँकेने आपल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

३) बचत खात्यासाठी देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा या खात्यासाठी देण्यात याव्यात, असेही परिपत्रकात म्हटले आहे. म्हणजेच या खात्यांना चेक बुक आणि डेबिट कार्डही देता येऊ शकते. डेबिट कार्ड आणि चेकबुक देताना बँकांनी त्याबाबतीत असलेल्या जोखमीचा विचार करून धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

४) अशी खाती उघडून घेण्याआधी संचालक मंडळाने या प्रकारचे धोरण तयार करणे आवश्यक आहे. या धोरणात खाते उघडण्याची पद्धत, त्यांना देण्यात येणाऱ्या सवलती, जोखीम आणि परिचलनाबाबतच्या सूचना याचा समावेश असावा.

५) ही खाती उघडताना याचे वर्गीकरण वेगळ्या पद्धतीने करणे सोयीचे ठरेल. म्हणजेच यासाठी कोअर बँकिंग प्रणालीत स्वतंत्र प्रॉडक्ट कोड देण्यात यावा, याबाबत विचार करण्यात यावा.

६) या प्रकारे उघडण्यात आलेल्या खात्याला किंवा अज्ञानाच्या पालनकर्त्यासहित उघडण्यात आलेल्या खात्याला ओव्हर ड्राफ्टची सोय देता येणार नाही. म्हणजेच या खात्यात फक्त जमा बाकी असणे बंधनकारक राहील.

७) या प्रकारे उघडल्या गेलेल्या खात्याचा खातेदार, त्याने वयाची १८ वर्षे पूर्ण करताच तो सज्ञान झाल्यावर, केवायसीची नवीन कागदपत्रे आणि खात्यावरील व्यवहाराबाबत सूचना घेतल्या जाव्यात.

८) याप्रकारे दहा वर्षांवरील वयाच्या मुला मुलींचे खाते उघडत असताना केवायसीची कागदपत्रे नियमांनुसार घेणे बंधनकारक असून ड्यू डिलिव्हिजन्स व्यवस्थितरीत्या करण्यात यावा, अशाही सूचना रिझर्व्ह बँकेने दिल्या आहेत.

९) रिझर्व बँक ऑफ इंडियाने या सूचना बँकिंग रेग्युलेशन कायदा १९४९ च्या कलम ३५ अ आणि ५६ या कलमानुसार दिलेल्या आहेत. या अनुषंगाने संचालक मंडळाने धोरण ठरवत असताना या तरतुदींचा काळजीपूर्वक अभ्यास करून धोरण ठरवणे अपेक्षित आहे.

१०) रिझर्व बँक ऑफ इंडियाने शालेय विद्यार्थ्यांसाठी ही परवानगी देऊन त्यांना बँकिंगच्या मुख्य प्रवाहात आणण्याची संधी दिलेली आहे.

नागरी सहकारी बँकांनी या धोरणाचा व्यवस्थित अभ्यास करून संचालक मंडळामध्ये विषयावर साधक बाधक चर्चा करून या प्रकारची खाती उघडण्याबाबत धोरणात्मक बदल करून घ्यावा. त्याचप्रमाणे संगणक प्रणालीमध्ये ही खाती वेगळ्या पद्धतीने दिसतील अशी व्यवस्था वेगळा प्रॉडक्ट कोड देऊन केली जावी. प्रत्येक शाखेच्या परिसरामध्ये शाळा असतात. शालेय विद्यार्थ्यांना बचतीचे महत्त्व समजावून सांगून या प्रकारची खाती उघडण्यासाठी प्रोत्साहन देता येईल. शाळेच्या सहकार्याने पालक आणि विद्यार्थ्यांसाठी एकत्रितपणे सभा किंवा मेळावे घेऊन या सेवेबद्दलची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येईल. शिक्षकांसाठी स्वतंत्र बैठक घेऊन, बचतीचे महत्त्व त्यांना विशद करून विद्यार्थ्यांची खाती उघडण्याचे आवाहन त्यांना करता येईल. नागरी सहकारी बँकांसाठी कासा (CASA)ठेवी वाढवण्याची ही चांगली संधी असून या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना बँकांची आणि बँकिंगची ओळख करून देता येईल आणि त्यांना आर्थिक प्रवाहामध्ये सामील करून घेता येईल.

आर्थिक साक्षरतेसाठी हे एक उत्तम पाऊल असून याचा नागरी सहकारी बँकांनी व्यवसाय वाढीसाठी उपयोग करून घ्यावा. यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या पालकांची, शाळेतील शिक्षकवृंदांची खाती बँकांना मिळवता येतील. स्थानिक बाजारपेठेत आपल्या बँकेची विविध स्तरांमध्ये ओळख होण्यासाठी या सवलतीचा उपयोग मार्केटिंग म्हणून करता येईल, या पद्धतीने याकडे पहावे. दीर्घकालीन योजना करून त्याची अंमलबजावणी करावी. यानिमित्ताने तरुण खातेदार नागरी सहकारी बँकांना मिळू शकतील. विद्यार्थी अवस्थेत बँकेच्या सेवा सवलतींची माहिती मिळाल्यास हा विद्यार्थी भविष्यातदेखील बँकेचा कायम ग्राहक राहील. या विद्यार्थ्यांना ग्राहक सेवा देण्यासाठी थोड्या वेगळ्या प्रकारचे प्रयत्न निश्चित करावे लागतील. त्यांना समजेल अशा पद्धतीने समजावून सांगावे लागेल आणि त्यांना बँकिंगची सवय लावता येऊ शकेल. बँकिंग क्षेत्राबाबत विद्यार्थी दशेपासून मुला-मुलींना बँकिंग व्यवसायाची ओळख या दृष्टीने या सेवेकडे बघितले जावे.

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)** ***


व्यापारी मित्र अमृतपर्व 25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | २५०० | १७०० | ९०० |
| रजिस्टर पोस्टाने | ३६०० | २४०० | १२६० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे - ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# सहकार भारती प्रशिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी संजय बिर्ला; उपाध्यक्षपदी शरद जाधव






**पुणे :** सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी जळगाव जनता बँकेचे माजी अध्यक्ष संजय बिर्ला यांची तर सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे संघटन प्रमुख शरद जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या संचालक मंडळ निवडणुकीत सर्व संचालक बिनविरोध निवडून आले आहेत. ते पुढीलप्रमाणे –

संजय बिर्ला (अध्यक्ष), शरद जाधव (उपाध्यक्ष), संचालक – सर्वश्री डॉ. उदय जोशी, भालचंद्र कुलकर्णी, अमित ओझे, सदानंद पावगी, सीए शिरीष गोडबोले, सीए रविंद्र चिंचवडकर, उदय पेंडसे, पांडुरंग राऊत, शिवाजीराव पाटील, डॉ. मुकुंद तापकीर, सौ. संध्या कुलकर्णी, सौ. उर्मिला प्रभूघाटे यांचा समावेश आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कराडचे उमेश मोहिते यांनी कामकाज पाहिले.

प्रशिक्षण प्रमुख म्हणून व्यंकटेश कुलकर्णी (छत्रपती संभाजीनगर) यांची निवड करण्यात आली आहे.

२००४ साली स्थापन झालेल्या या प्रशिक्षण संस्थेला महाराष्ट्र शासनाने शिखर प्रशिक्षण संस्थेचा दर्जा दिला असून राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना, त्यांच्या कर्मचारी व संचालकांना प्रशिक्षण देण्यात येते. सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणातील गुणांसाठी सहकार भारती प्रशिक्षण संस्थेचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येते.

# पुणे जिल्हा सहकारी बँकेला ७५ कोटी रुपयांचा नफा



अध्यक्ष
डॉ. दिगंबर दुर्गाडे

**पुणे** – नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात पुणे जिल्हा सहकारी बँकेला ७५ कोटी रूपयांचा नफा झाला असल्याची माहिती बँक अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी सांगितली. तसेच बँकेच्या नवीन शाखा सुरू करण्याबाबत नव्याने काही प्रस्ताव आले आहेत.

बँकेने आर्थिक वर्षात ठेवी, कर्ज, व्यावसायिक उलाढाल, स्वनिधी, नफा, नेटवर्थ आणि एन.पी.ए. या सर्व स्तरावर चांगली कामगिरी नोंदविली आहे, असे नमूद करून ते म्हणाले, बँकेने वर्षभरात २६ हजार ८२६ कोटींची व्यावसायिक उलाढाल केली असून निव्वळ नफा ७५ कोटी ७५ लाख इतका झाला आहे. बँकेने खरीप आणि रब्बी हंगामासाठी एकूण ३ लाख १२ हजार ६३९ सदस्यांना २ हजार ९९१ कोटीचे कर्ज वितरित केले आहे. कर्ज वितरणाचे १०९ टक्के उद्दीष्ट पूर्ण केले आहे. ढोबळ एनपीए २.६० टक्के असून नेट एनपीए शून्य टक्के आहे.

बँकेच्या सध्या २९४ शाखा कार्यरत आहेत असे नमूद करून ते म्हणाले, नव्याने ६० शाखा सुरू करण्याचे प्रस्ताव आले आहेत. राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेची २ लाखांपेक्षा अधिक खाती एकही रुपया न भरता उघडण्यात आली आहेत, असे त्यांनी सांगितले.

सहकार विभागाने नुकतीच नोकरभरती प्रक्रियेस मान्यता दिली असून त्यानुसार नजीकच्या काळात लेखनिक पदांची सुमारे ७९० पदे दोन टप्प्यांमध्ये भरण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी सांगितली.

# योगीराज सहकारी पतसंस्थेला राष्ट्रीय आदर्श सहकारी संस्था पुरस्कार प्रदान

**पुणे** – येथील योगीराज सहकारी पतसंस्थेला नुकताच राष्ट्रीय आदर्श सहकारी संस्था पुरस्कार एका समारंभात प्रदान करण्यात आला आहे. संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकीर, उपाध्यक्ष राजेश विधाते, शाखाध्यक्ष शंकर सायकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

गेल्या २९ वर्षाच्या कालावधीत संस्थेने केलेल्या वाटचालीचा आणि सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून संस्थेने केलेल्या कार्याची पावती पुरस्काराच्या रूपाने मिळाली आहे, असे तापकीर यांनी सांगितले.

# पुणे अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी निलेश ढमढेरे

**पुणे** – पुणे अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी निलेश ढमढेरे आणि उपाध्यक्षपदी बाबासाहेब वीर यांची फेरनिवड करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची सभा मुकुंद पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. नूतन पदाधिकाऱ्यांची निवड आगामी पांच वर्षासाठी असणार आहे.

# लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीची अक्षय मुदत ठेव योजना

**पुणे** – लोकमान्य मल्टिपर्पज को–ऑप. सोसायटीच्या वतीने अक्षय मुदत ठेव योजना सुरू केली आहे. यामध्ये चांगल्या परताव्याची हमी देण्यात आली आहे. या गुंतवणूक योजनेसाठी १० टक्के व्याज दर असून जेष्ठ नागरिकांसाठी ०.५० हा अधिकचा व्याज दर असणार आहे. या योजनेत ग्राहक आणि खातेदार १० हजार रुपयांची किमान गुंतवणूक करू शकतात असे सांगण्यात आले.

# बिगरशेती पतसंस्थांची गुंतवणूक आणि वैधानिक तरलता

कर्ज आणि गुंतवणूक या उद्देशासाठी मागणीनुसार परतफेड करता येतील, या अटीवर केवळ त्यांच्या नियमित किंवा 'अ' वर्ग ('ब' वर्ग किंवा नाममात्र सभासद सोडून) सभासदांकडूनच ठेवी गोळा करणे, हा प्रत्येक बिगरशेती पतसंस्थेचा मूलभूत व्यवसाय आहे.

कोणतीही बिगरशेती पतसंस्था ही जेवढ्या ठेवी गोळा करते, त्या सर्वच्या सर्व ठेवी कर्जरुपाने वितरण करू शकत नाही. प्रत्येक बिगरशेती पतसंस्थेला सहकार कायदा/नियामक मंडळ तसेच सहकार खात्याच्या निर्देशानुसार आवश्यक तेवढी रोख व वैधानिक तरलतेपोटी गुंतवणुक करावी लागते. याचा अर्थ आवश्यक रोक व वैधानिक तरलतेपोटी गुंतवणुक प्रमाण पूर्ततेनंतर कर्ज वितरणाबरोबरच उर्वरित रकमेची वैकल्पिक किंवा बिगर वैधानिक तरलता गुंतवणूक करता येते. वैधानिक गुंतवणूक ही कायद्याने बंधनकारक असल्याने प्रसंगी उत्पन्न क्षमता विचारात न घेता मर्यादित व निर्धारित साधनांमध्ये ती करावीच लागते या उलट वैकल्पिक गुंतवणुकीसाठी अधिक पर्याय उपलब्ध असतात.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

गुंतवणूक म्हणजे भविष्यामध्ये व्याज अथवा लाभांश स्वरूपात उत्पन्न मिळवण्यासाठी वर्तमान कालावधीत केलेला त्याग आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. गुंतवणुकीमधील उत्पन्न हे अनिश्चित स्वरूपाचे असून यामध्ये जोखीम स्वीकारलेली असते. जितकी जोखीम अधिक तितके उत्पन्न देखील अधिक (Higher the risk, Higher the reward) असते. गुंतवणुकीमध्ये असणारी जोखीम विचारात घेता जोखीम टाळता येत नसली तरी तिचे नियमन कसे करायचे हे पाहणे खूप महत्त्वाचे आहे. अनेक वेळेला गुंतवणुकीमध्ये प्रथम दर्शनी मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याचे दिसते, परंतु त्यामध्ये नेमकी कोणती जोखीम दडलेली आहे किंवा अदृश्य स्वरूपातील जोखीम कोणती आहे हे लक्षात येत नसल्याने कोणतीही गुंतवणूक करताना ह्या बाबी नजरेआड करून चालत नाही.

**कोणतीही गुंतवणूक करताना प्रामुख्याने तीन मुलभूत गोष्टी तपासणे महत्त्वाचे असते.**

**१) सुरक्षा :–** गुंतवणुकीची मूळ मुद्दल व व्याज रक्कम मुदत पूर्व किंवा मुदत संपल्यावर तातडीने परत मिळण्याची निश्चितता असावी.

**२) तरलता :–** गुंतवणूक मुदतीनंतर परत घेताना व्याजासह मुद्दलाचे कोणतेही नुकसान न होता मात्र मुदत पूर्व बंद केल्यास मुद्दलाचे कोणतेही नुकसान न होता मात्र केवळ अल्प प्रमाणात व्याज नुकसान विचारात घेऊन गुंतवणूक त्वरील मिळण्याची खात्री असावी.

**३) उत्पन्न स्थिरता :–** उत्पन्नाची स्थिरता म्हणजे उत्पन्नाची नियमितता व सातत्य असावे. याचा अर्थ मिळणारे व्याज उत्पन्न अटी किंवा शर्ती पूर्ततेवर अवलंबून नसावे.

बिगरशेती पतसंस्था यांना देखील आता रोख राखीव व वैधानिक तरलता निधी बाबत वैधानिक तरतूद असून त्याचे उल्लंघनाबाबत दंडात्मक कारवाई देखील नमूद आहे. वास्तविक बँकिंगसारख्या व्यवसायामध्ये तरलता ही अत्यंत महत्त्वाची असते व त्याचे प्रतिकूल परिणामदेखील बिगरशेती पतसंस्था चळवळीच्या बाबतीत दिसून येत आहेत.

या दृष्टीने नागरी सहकारी पतसंस्थांसाठी विद्यमान सहकार कायद्यामध्ये दि. २२ फेब्रुवारी २०१९ पासून प्रकरण-११ (एक) (अ) हे स्वतंत्रपणे समाविष्ट करण्यात आले असून त्यामध्ये एकूण कलम १४४ (२) (अ) ते कलम ९४४(३१) (अ) अशी विविध कलमे समाविष्ट करण्यात आली. त्यामधीलच कलम १४४ (९) (अ) मध्ये रोख राखीव निधी व १४४(१०) (अ) वैधानिक तरलता निधी या यासंदर्भातील स्वयंस्पष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत.

रोख राखीव व वैधानिक तरलता निधी या दोन्हीचे प्रमाण बिगरशेती पतसंस्थेच्या प्रत्येक तिमाही अखेरच्या एकूण शिल्लक ठेवीवर नियामक मंडळाने निर्धारित केले असून प्रत्येक तिमाही अखेरच्या एकूण शिल्लक ठेवीवर लगतचे पुढील तिमाहीमध्ये दररोज हे निर्धारित किमान प्रमाण शिल्लक ठेवणे बंधनकारक आहे.

रोख राखीव निधी च्या बाबतीत रोख रकमेच्या स्वरूपात किंवा एखाद्या निर्धारित बँकेमधील (राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक) चालू किंवा बचत खात्यामध्ये किंवा पंधरा दिवसांपासून अधिक नसेल इतक्या दिवसांच्या निर्धारित बँकेमधील अल्प मुदत ठेवीच्या स्वरूपात अशी रक्कम ठेवावयाची असून वैधानिक तरलता निधी हादेखील रोख राखीव निधीप्रमाणे प्रत्येक तिमाही अखेर ठेव रकमेवर निर्धारित (राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक) बँकेमध्ये मुदत ठेव स्वरुपात ठेवावयाचा आहे.

रोख राखीव निधी रक्कम निर्धारित बँकेमध्ये (राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँक) बचत चालू अथवा व पंधर दिवसांपेक्षा अधिक कालावधी नसलेल्या अल्पमुदत ठेव स्वरूपात तर व वैधानिक तरलता निधीची रक्कम निर्धारित बँकेमध्ये मुदत ठेव स्वरूपात ठेवावयाची असल्या बाबतीत कायद्यात स्पष्ट तरतूद आहे. याचा अर्थ यासाठी वरील नमूद गुंतवणूक साधनांमध्ये केवळ ठेवी हा शब्द असल्याने या ऐवजी अन्य कोणतेही गुंतवणूक साधन यासाठी पात्र होणार नाही हे स्पष्ट होत आहे.

निर्धारित बँक म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील 'कलम ७० मध्ये नमूद केलेली बँक' अशी स्पष्ट शब्दरचना असल्याने यामध्ये केवळ निर्धारित बँकांमधील गुंतवणूक म्हणजे राज्य किंवा जिल्हा मध्यवती बँकेतील गुंतवणूक असा अर्थ स्पष्ट आहे. तसेच निर्धारित बँकेत म्हणजेच राज्य किंवा जिल्हा मध्यवर्ती बँकेत गुंतवणूक करताना काही निकष पूर्ततादेखील आहेत त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

याशिवाय या कलमात 'राज्य शासनाने, नियमांद्वारे किंवा त्या बाबतीत दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी दिलेल्या इतर कोणत्याही प्रकारे गुंतवणूक करता येते' अशी एक तरतूद आहे. यासंदर्भात राज्य शासनाने दिलेल्या सीसीआर /प्र.क्र.१३०९/७स दि. ५ डिसेंबर २०१३ रोजीचे विशेष आदेशाद्वारे काही शर्ती पूर्तता करण्याचे अटीवर परवानगी दिलेल्या नागरी सहकारी, राष्ट्रीयीकृत अथवा प्रादेशिक ग्रामीण बँकेत बचत, चालू, अल्पमुदत तसेच मुदत ठेव स्वरुपात गुंतवणूक करण्यास परवानगी दिली असल्याने या तीन प्रकारच्या बँका यातील नमूद शर्ती पालन करण्याच्या अटीवर रोख राखीव निधी व वैधानिक तरलता निधी गुंतवणुकीसाठी पात्र होतील. सध्या तरी या व्यतिरिक्त अन्य कोणताही या संदर्भात शासन आदेश नाही.

यातील विशेष आदेशाद्वारे असणारया अटींमध्ये नागरी सहकारी, बँकांच्याबाबतीत मागील लागोपाठ तीन वर्षांत लेखापरीक्षणात निदान 'अ' वर्ग प्राप्त होणे व ज्या नागरी सहकारी बँकेत गुंतवणूक केली जाणार आहे त्या बँकेने म.स.सं. नियम १९६९ मधील नियम ३५ ची पूर्तता

पुढील पानावर...

# अर्थसिद्धी सहकारी पतसंस्थेचा रौप्य महोत्सव उत्साहात साजरा

**पुणे –** येथील अर्थसिद्धी सहकारी पतसंस्थेचा रौप्यमहोत्सव आगल्या वेगळ्या रीतीने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पतसंस्थेने महिला सबलीकरणाचा निर्णय घेत महिला स्वयंसहायता गटांना सूक्ष्म वित्तपुरवठा देण्याची योजना जाहीर केली.

उपक्रमाचा प्रारंभ राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे, बुलढाणा अर्बन क्रेडिट सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, शिवकृपा पतसंस्थेचे अध्यक्ष गोरख चव्हाण, उपाध्यक्ष चंद्रकांत वंजारी आदी उपस्थित होते. पतसंस्थेचे अध्यक्ष भगवान कोठावळे यांनी संस्थेच्या वाटचालीची माहिती सांगितली. आगामी वर्षात १००८ महिलांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी विविध पतसंस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

गेल्या २५ वर्षांत पतसंस्थेच्या वतीने अनेकविध उपक्रम यशस्वीपणाने राबविण्यात आले.

# ज्ञानदीप सहकारी पतसंस्थेचे आगामी आर्थिक वर्षासाठी ७३५० कोटी व्यवसाय उद्दिष्ट

**मुंबई –** येथील ज्ञानदीप सहकारी पतसंस्थेने आगामी आर्थिक वर्षासाठी ७३५० कोटींचा व्यवसायाचे उद्दीष्ट ठरविले आहे. संस्थेच्या एका बैठकीत अध्यक्ष जिजाबा पवार यांनी ही माहिती सांगितली. संस्थेच्या ठेवीत २०९ कोटी तर कर्ज वाटपात २९४ कोटी वाढ झाली आहे तर संमिश्र व्यवसाय हा ६५५७ कोटी इतका झाला आहे. संस्थेच्या वतीने साडे आठ टक्के दराने गृह कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच संस्थेतील ठेवींना विमा संरक्षण देण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

# राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या मोबाइल ॲप्लिकेशनचे लोकार्पण

**पुणे –** येथील राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या वेलकम किट आणि अद्ययावत करण्यात आलेल्या मोबाइल ॲप्लिकेशनचा लोकार्पण कार्यक्रम नुकताच पार पडला. बँकेचे अध्यक्ष शांताराम धनकवडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. नवीन वेलकम किटच्या माध्यमातून पासबुक, चेकबुक, डेबिट कार्डसह मोबाईल बँकिंग, एटीएम बँकिंग आदी विविध सुविधांची माहितीपत्रके घरपोच मिळू शकणार आहेत.

मागील पानावरून...

# बिगरशेती पतसंस्थांची गुंतवणूक आणि वैधानिक तरलता

करणे या दोन निकषांची पूर्तता करणे आवश्यक असून या दोन्ही अटींची पूर्तता निकष हा राष्ट्रीयीकृत अथवा प्रादेशिक ग्रामीण बँकांना लागू नसला तरी राष्ट्रीयीकृत अथवा प्रादेशिक ग्रामीण या बँकांचे बाबतीत गुंतवणूक करताना बिगरशेती पतसंस्थेच्या केवळ मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या या बँकांचे शाखेत गुंतवणूक करता येणार आहे.

यामध्ये शेड्यूल्ड, खाजगी किंवा लघुवित्त बँका असा कोठेही शब्द प्रयोग नसल्याने खासगी किंवा लघुवित्त बँकांमधील गुंतवणूक ही रोख राखीव निधी व वैधानिक तरलता निधीसाठी पात्र होणार नाही. तसेच सरकारी कर्ज रोख्यांप्रमाणे कलम ७० प्रमाणे अन्य कोणतीही गुंतवणूक वैध असली तरीदेखील सदर गुंतवणूक वैधानिक तरलतेसाठी सध्यातरी पात्र नाही. वरील सर्व बाबी पाहता यामध्ये निर्धारित बँकेतील मागणी व मुदत स्वरूपातील ठेवी व्यतिरिक्त अन्य कोणतीही गुंतवणूक वैधानिक तरलतेसाठी सध्यातरी पात्र नसल्याचे अनेक पतसंस्थांना माहिती नसल्याने व त्यांनी ही गुंतवणूक या निर्धारित पूर्ततेसाठी ग्राह्य धरल्यास त्यांचे रोख राखीव निधी व वैधानिक तरलता निधीचे उल्लंघन होऊ शकते व पर्यायाने दंडात्मक कारवाई होऊ शकते. भविष्यात ही गुंतवणूक वैधानिक तरलतेसाठी पात्र झाल्यास प्रश्न येणार नाही.

वैधानिक तरलतेची गुंतवणूक करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे ही गुंतवणूक बिगरशेती पतसंस्थेला कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपलब्ध होणे अपेक्षित असल्यानेच काही निकष पूर्तीच्या अटीवर बिगरशेती पतसंस्थेला निर्धारित बँकांमधील केवळ मागणी अथवा मुदतठेवींमध्येच सध्यातरी ही गुंतवणूक करण्यास सूचित केले आहे. याचा सरळ सरळ अर्थ असा होतो की, निर्धारित बँकांमधील मागणी अथवा मुदतठेवी व्यतिरिक्त निर्धारित बँकेत अन्य कोणत्याही साधनांमध्ये गुंतवणूक केल्यास ही गुंतवणूक रोख अथवा वैधानिक तरलतेसाठी पात्र राहणार नाही.

रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी तसेच राज्य आणि जिल्हा बँकांना त्यांचे प्राथमिक तसेच दुय्यम भांडवल उभारणीसाठी विविध गुंतवणूक साधने (उदा. डेट इन्स्ट्रुमेंट.एल.टी.डी इत्यादी) उपलब्ध करून दिली आहेत. या साधनांमधील गुंतवणूक ही त्या बँकेतील प्राथमिक अथवा दुय्यम भांडवलामधील गुंतवणूक असून अगदी एल.टी.डी.च्या बाबतीत त्यामध्ये ठेव हा शब्द असला तरी ती गुंतवणूक केव्हाही उपलब्ध होणार नसल्याने ठेव गुंतवणुकीची कोणतीच वैशिष्ट्ये यातील कोणत्याच गुंतवणुकीला लागू होत नाहीत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, शासन आदेश व सहकार खाते आणि नियामक मंडळ यानी बिगरशेती पतसंस्थेने कोण कोणत्या साधनामध्ये गुंतवणूक करण्यास मुभा दिली आहे, याची सविस्तर माहिती घेतल्यानंतर अशाच साधनांमध्ये गुंतवणूक करणे हे नक्कीच संस्था हिताचे आहे.

जी साधने उपलब्ध नाहीत अशा साधनांमधील गुंतवणुकीबाबतीत जोपर्यंत शासन अध्यादेश येत नाही, तोपर्यंत बिगरशेती पतसंस्थेने गुंतवणूक करणे देखील जोखमीचे आहे.

अगदी थोडक्यात म्हणायचे तर बिगरशेती पतसंस्थेच्या बाबतीत रोख राखीव तसेच वैधानिक तरलतेसाठी पात्र गुंतवणुकीसाठी म.स.सं.अधि. कलम १४४ (९) (अ) व १४४(१०) (अ) मधील तसेच अन्य गुंतवणुकीसाठी म.स.सं.अधि. कलम ७० मध्ये नमूद असलेल्या तरतुदींचा बारकाईने अभ्यास करूनच गुंतवणूक करणे आवश्यक आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. याचा अर्थ म.स.सं.अधि. कलम ७० नुसार मुभा असणारी प्रत्येक गुंतवणूक ही म.स.सं.अधि. १४४ (९) (अ) व १४४ (१०) (अ) नुसार रोख राखीव तसेच वैधानिक तरलतेसाठी पात्र गुंतवणूक असेलच असे नाही.

बिगरशेती पतसंस्थांसाठी आता रोख राखीव तसेच वैधानिक तरलता गुंतवणूक ही अनिवार्य बाब झाली असून यामध्ये दंडात्मक कारवाई तरतूद अंतर्भूत आहे. अशा प्रकारची दंडात्मक कारवाई होणार नाही. तसेच कोणतीही गुंतवणूक तातडीने उपलब्ध होईल, अशाच पद्धतीने गुंतवणूक करणेची आवश्यक दक्षता घेण्याची नक्कीच गरज आहे.

**– गणेश निमकर पुणे मो. ९८२२५६८५५०**

*******

# नामांकन पद्धती समजून घेण्याची आवश्यकता

बँकांमधील विविध प्रकारच्या ठेवी ही उत्तम गुंतवणूक समजली जाते. सहज काढता येते, त्याला तरलता असते. बचत खाते, आवर्ती (रिकरिंग) खाते आणि मुदत ठेव खाती हे खात्यांचे प्रमुख प्रकार आहेत. खात्यांच्या अनेक नियमांमध्ये नामांकन करणे महत्त्वाची गोष्ट असते. खाते काढतानाच त्या फॉर्मवर नामांकन नमूद करावे लागते. डिसेंबर २०२४ मध्ये पास झालेल्या रिझर्व्ह बँक - बँकिंग बिल नियमांनुसार नामांकन पद्धतीत बदल केला आहे. तिथे आता एकूण चार व्यक्तींच्या नावे नामांकन करता येणार आहे.



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

आत्तापर्यंत विविध प्रकारच्या प्रत्येक खात्यासाठी खाते काढताना खातेदारास फक्त एकाच व्यक्तीच्या नावाने नामांकन करता येत होते. नामांकन केलेल्या व्यक्तीस नामिती असे संबोधतात. खातेदाराच्या मृत्यूपश्चात त्याच्या खात्यातील सर्व रक्कम प्राप्त करण्यासाठी नामिती विश्वस्ताची भूमिका बजावतो. बँकेकडे ठराविक हक्क फॉर्म (Claim Forms) आणि केवायसी कागदपत्रांची पूर्तता करून ओळख पटवून द्यावी लागते. नामितीस रक्कम स्वीकारण्याचा अधिकार असतो, परंतु त्याला मालकी हक्क मिळत नाही. मृत ठेवीदाराच्या वारसदारांचा त्या ठेव रकमेवरील हक्क अबाधित राहतो.

या आधीच्या पद्धतीत काही समस्या येत होत्या. नामिती व्यक्तीचा खातेदाराच्या आधीच मृत्यू झालेला असेल आणि खातेदाराकडून नामांकन बदलले गेले नाही तर निधी हस्तांतरण अवघड होत होते. दुसरे नामांकन नाही, तसेच मृत्युपत्रही केलेले नसेल तेव्हा अशा परिस्थितीत खात्यातील पैसे देणे बँकेला शक्य होत नाही. पैसे मिळतात पण गुंतागुंतीची प्रक्रिया, हेलपाटे, कागदपत्रे सर्व करावे लागते. त्यावर कोणीच अधिकाररित्या आपला हक्क दाखवू शकत नाही. सर्वांत शेवटी अशावेळी खात्यातील रक्कम पैसे बँकेत १० वर्ष पडून राहतात आणि बँकेकडून कालांतराने रिझर्व्ह बँकेतील DEAF - Depositors Education and Awareness Fund 2014 यामध्ये जमा केले जातात. त्याने कुटुंबातील, घरातील नात्यातील जवळच्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर पैसे न मिळाल्याने मतभेद होऊन त्रासदायक परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून बदल केला गेला आहे. फंडात अडकलेले पैसे काढता येतात, पण त्यासाठी त्यांचे बरेच नियम, दाखले यांची पूर्तता करून बँकेच्या मार्फत पैसे परत मिळू शकतात. खूप द्राविडी प्रयत्न करावे लागतात.

नवीन अलीकडच्या प्रस्तावित सुधारणांमुळे नियमांनुसार खातेदार बँकेतील ठेवीचे खात्यास जास्तीतजास्त चार व्यक्तींची नामांकन करू शकेल. आपल्या विश्वासातील, स्वत:ची मुले, वा अन्य नातेवाईक अथवा इतरही कोणी यांना नामांकित करणे हे पूर्णत: खातेदाराने आपल्या विचाराने आवडीनुसार गरजेनुसार ठरवायचे आहे. ठेवीदारांना त्यांच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करताना अधिक विस्तारित लवचिकता आणि सुरक्षितता दिलेली आहे. त्याने कुटुंबातील पैशावरून होणारी वादावादी, वाटणी पद्धत अधिक चांगली होऊन एकूणात ठेवी हस्तांतरण प्रक्रिया सोपी व सुलभ होणार आहे.

याचे दोन प्रकार आहेत. **(1) Joint Nomination -** एकाच वेळी एकत्रित - ठेव रक्कम विभागणी ठरवून देणे - उदा. पत्नीस ५०%, उरलेली दोन मुलांना २५/%-२५%. मुलांच्या आईच्या निधनानंतर दोन्ही मुलांमध्ये विभागणी.

**(2) Successive Nomination -** उत्तराधिकारी नियोजन - एकानंतर दुसऱ्यास ठेव रक्कम देण्यात यावी. पहिला नामितीच्या मृत्यूनंतर दुसऱ्याचा नंबर नमिती म्हणून येईल, नंतर तिसरा व चौथा. जसे नमूद केले असेल त्यानुसार एकमागून एक येईल.

उदा. आधी पत्नी - मुलांची आई (१००%) - आईच्या मृत्यूनंतर नंतर मोठा मुलगा - त्याचे निधन झाल्यावर मोठी मुलगी - आणि चौथा नामिती लहान मुलगी.... अशा क्रमाने एकामागून एक.

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्यांनी नमूद केल्यानुसार नवीन नियमांनुसार सर्व नामितींच्यामध्ये निधी वितरित करणे प्रक्रिया सुलभ होईल. प्रत्येकाने बँकेत चौकशी करून काय ते करावे.

******

## सहकार भारतीच्या कार्य प्रसारासाठी प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके यांचा दौरा

**वसई -** सहकार भारतीच्या कार्याच्या प्रसारासाठी प्रदेशचे अध्यक्ष दत्ताराम चाळके आणि महामंत्री विवेक जुगादे तसेच उपप्रमुख मधुसूदन पाटील यांनी वसई विभागाचा दौरा केला. यावेळी कोकण आणि पालघर जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

विविध सहकारी बँकांचे पदाधिकारी आणि आजी माजी लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. सहकार क्षेत्राच्या विषयाबाबत आमदार राजन नाईक यांच्या समवेत सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई परिसरात सहकार भारतीला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

## शिवकृपा पतपेढीच्या मिश्र व्यवसायात वाढ

**पुणे -** येथील शिवकृपा पतपेढीच्या मिश्र व्यवसायात एकूण ५३६ कोटींची वाढ झाली आहे, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गोरख चव्हाण यांनी सांगितले. ते म्हणाले, ठेवी २ हजार ९०८ कोटी इतक्या असून कर्जवाटप २ हजार २१७ कोटी आहे. संस्थेने एकूण ५ हजार १२५ कोटी व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. संस्थेचा एकूण निधी ३६७ कोटी इतका असून ११६५ कोटींची गुंतवणूक केली आहे. संस्थेला एकूण ६० कोटीचा नफा झाला आहे, असे त्यांनी सांगितले.

## राज्य सहकारी बँकेला आर्थिक वर्षात ६५१ कोटीचा नफा

**पुणे -** राज्य सहकारी बँकेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ६५१ कोटीचा नफा झाला असून व्यवसाय ६२ हजार कोटींचा झाला असल्याची माहिती प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितली. गेल्या चार वर्षांपासून बँक सतत नफा मिळवत आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने ६१ हजार ९५६ कोटी रूपायांचा व्यवसाय केला असून त्यामध्ये ३५ हजार ५९७ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

स्वनिधी ७ हजार ७३७ कोटींचा असून निव्वळ संपत्ती ५ हजार ३०० कोटी इतकी झाली आहे. गेल्या चार वर्षात बँकेच्या नफ्यात वाढ होत आहे तर यावर्षीचा नफा सर्वात विक्रमी आहे. राज्य सहकारी बँकेस आर्थिक अडचणीत असलेल्या नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संस्थात्मक प्रशासक म्हणून राज्य सरकारने नवीन जबाबदारी दिली आहे. त्याचप्रमाणे नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संस्थात्मक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस राज्य सहकारी बँकेने ३०० कोटींचे अल्प व्याजदराने कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

# मनी लॉन्ड्रिंग : पतसंस्थांसाठी जागरुकता व सावधगिरी

The Prevention of Money Laundering Act, 2002 (PMLA) किंवा सामान्य भाषेत आपण ज्याला अँटी मनी लॉन्ड्रीग असे संबोधतो. खरं तर हा विषय देशाची सुरक्षितता, आर्थिक घोटाळे, कर चोरी अशा बाबींशी संलग्न आहे, ज्याप्रमाणे कपडे धुण्याकरिता आपण लॉन्ड्री या शब्दाचा वापर करतो, त्याचप्रमाणे ब्लॅक मनीला व्हाईट मनीमध्ये रूपांतरीत करणे, याला ( मनी लॉन्ड्रीग) असे म्हटले जाते. असा बेकायदेशीर पैसा कायदेशीर करण्याकरता शेल कंपन्या, आयात निर्यात कंपन्या, कॉन्ट्रॅक्टमधील ओव्हर एनव्हाइसिंग, हवाला बँकिंग, रियल इस्टेट किंवा गोल्ड इंवेस्टमेंट, इन्शुरन्स, सरकारी कंत्राट अशा माध्यमांचा वापर केला जातो. या सर्व माध्यमातून पैसा हस्तांतरणासाठी किंवा कायदेशीर व्यवहार दाखवण्यासाठी एखाद्या प्लॅटफॉर्मची आवश्यकता असते व हा प्लॅटफॉर्म म्हणजेच बँक किंवा पतसंस्थेमध्ये असलेले त्या व्यक्तीचे अकाउंट/खाते होय.



मंगेश देहेडकर
९९२१३ ०४८११

आपण विचार करत असाल गेल्या काही वर्षापर्यंत मनी लॉन्ड्रीग या विषयाची खूप जास्त भीती पतसंस्थांना किंवा मल्टीस्टेट सोसायटी यांना नव्हती. मग आता याबद्दल जास्त विचार करण्याची आवश्यकता का आहे?

आपण जर गेल्या पाच वर्षांचा काळ पाहिला तर असे लक्षात येईल की सरकारची धोरणे हे अशा प्रकारच्या बेकायदेशीर व्यवहारांवर नियंत्रण आणणे हे राहिले आहे आणि याकरिता बँकांतील खात्यांवर आरबीआयच्या मार्फत खूप मोठ्या प्रमाणात नियंत्रण आणले गेले आहे. यामध्ये हाय व्हॅल्यू ट्रांजेक्शन रिपोर्टींग व सस्पेशियस ट्रांजेक्शन रिपोर्टींग हे बँकांना अधिक काळजीपूर्वक तपासून संबंधित ऑथॉरिटीला माहिती देण्याकरिता बंधनकारक केले आहे. गोल्ड व प्रॉपर्टी खरेदी-विक्री या संदर्भातील नव्या तरतुदी तसेच इन्कम टॅक्सच्या माध्यमातून दोन लाखांपेक्षा अधिक रकमेचे व्यवहार कॅशमध्ये न करणे, अशा अनेक बदलातून शासनाने असे बेकायदेशीर व्यवहार नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला आहे. यामागील पाच वर्षाच्या काळात या बदलांमुळे असे व्यवहार करणाऱ्या व्यक्तींनी डिजिटल अकाउंट, पेमेंट बँक अकाउंट व ई-वॉलेट अशा माध्यमांचा खूप मोठ्या प्रमाणात वापर करणे सुरू केले होते. अशा प्रकारच्या खात्यांचा गैरवापर होतोय, हे लक्षात आल्यावर त्यावरदेखील आरबीआयने अनेक निर्बंध घातले. मग असे व्यवहार करण्याकरिता सॉफ्ट टारगेट गेल्या पाच वर्षात व प्रकर्षाने गेल्या तीन वर्षात पतसंस्था व मल्टीस्टेट सोसायटी या झाल्या आहेत. आता पतसंस्थांना टार्गेट करण्याकरिता सर्वात प्रथम अशा व्यक्ती पतसंस्थांमध्ये अनेक खाते एकाच शाखेत किंवा पतसंस्थेच्या अनेक शाखांमध्ये वेगवेगळ्या नावाने उघडतात. अशा खात्यांवरती वेगवेगळ्या जिल्ह्यातून, राज्यातून रक्कम जमा व्हायला लागतात. अशा रक्कम या कॅश स्वरूपात किंवा ट्रान्सफरने इतर खात्यामध्ये वळवून विथड्रॉल केल्या जातात. प्रत्येक वेळी अशा रक्कम या मोठ्या स्वरूपाच्या असतीलच असे नाही. उलट छोट्या छोट्या रकमेच्या अनेक ट्रांजेक्शन जास्त केल्या जातात. काही काळ असे व्यवहार सातत्याने शाखांवरती सुरू असतात. रक्कम या लहान आकाराच्या असल्यामुळे कर्मचारीदेखील अशा व्यवहारांची विशेष चौकशी करत नाही. यानंतर काही काळातच बँकेकडून आपल्याला कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेचे खाते गोठविण्यात आलेले आहे. चौकशीअंती पतसंस्थेला समजते की, कुठल्यातरी इतर राज्यातून आपल्या पतसंस्थेतील एखाद्या किंवा अनेक ग्राहकांच्या खात्यात काही रक्कम आल्या व ज्या लोकांची फसवणूक झालेली आहे त्या लोकांनी या खातेदारांविरुद्ध तक्रार दाखल केली व त्या कारणाने पतसंस्थेचे खाते गोठविण्यात आलेले आहे. वास्तवात पतसंस्थांना असे वाटते की, सदर व्यवहार हा पतसंस्थेचे खातेदार आणि फसवणूक झालेली व्यक्ती यामध्ये झालेला असताना पतसंस्थेचे खाते का गोठविण्यात आले आहे? याचे कारण सायबर गुन्हे अन्वेषण किंवा तत्सम यंत्रणांना पैसे कोठून कुठल्या बँकेमध्ये ट्रान्सफर झाले.

याची चेन ही शेवटी पतसंस्थेच्या खात्यापर्यंतच जाऊन सापडते व थांबते. त्यापुढे पतसंस्थेच्या खातेदाराची माहिती ही अशा यंत्रणांकडे जात नाही. त्यामुळे सदरील व्यक्ती ऐवजी पतसंस्थेचे खाते गोठविण्यात येते. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे केवायसी नॉम्सअनुसार नो युवर कस्टमर म्हणजेच तुम्ही ज्या व्यक्तीला खाते उघडू दिले आहे. अशा व्यक्तीच्या त्या खात्यावरील व्यवहाराची माहितीदेखील पतसंस्थेने ठेवणे आवश्यक आहे. त्या व्यक्तीचा खाते उघडण्याचा उद्देश काय होता? ज्या उद्देशाने खाते उघडले तो उद्देश कायदेशीर होता की नाही? त्या खात्यावर झालेले सर्व व्यवहार हे कायदेशीर आहेत किंवा नाही? यासंदर्भात तपासणी करण्याची जबाबदारी ही बँकांची व पतसंस्थांची आहे. त्यामुळे केवळ आधार कार्ड किंवा पॅन कार्ड घेतले म्हणजे संस्थेची जबाबदारी संपली असे नाही.

बँकांमध्ये असे खाते उघडण्यापूर्वीच अँटी मनी लॉन्ड्रीग / ए एम एल सॉफ्टवेअरचा वापर करून अशा व्यक्तीने इतर कुठल्या बँकेमार्फत गैरव्यवहार केलेला आहे का? हे शोधूनच त्या व्यक्तीचे खाते उघडायचे किंवा नाही हे ठरवले जाते. या व्यतिरिक्तदेखील दैनंदिन व्यवहारात खात्यावर कुठल्याही प्रकारचे संशयित व्यवहार आढळल्यास त्वरित असे खाते गोठविले जाते. परंतु अशी यंत्रणा ही आपल्या पतसंस्थेमध्ये नसल्यामुळे अशा व्यवहारांना आळा घालणे हे आपल्याला शक्य होत नाही.

हा विषय पतसंस्थांसाठी दिवसेंदिवस अधिक अडचणीचा ठरणारा आहे. आजच कित्येक कोटी रुपये पतसंस्थांची प्रत्यक्ष चूक नसताना देखील बँकांमध्ये अडकले आहेत. अनेक संस्था या आमच्याकडे अशा घटना झाल्यानंतर मार्गदर्शनाकरिता येतात. यातून सुखरूप बाहेर पडण्याकरता कायदेशीर मार्ग जरी असले तरी देखील ते थोडे क्लिष्ट स्वरूपाचे व वेळ खाऊ असतात. थोडक्यात रोगापेक्षा इलाज कडक अशी अवस्था होऊ शकते. याकरिता संस्थांना आमचे कायम सांगणे असते की, प्रिव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर! याकरिता संस्थांनी सर्वात प्रथम अनोळखी व्यक्तीचे खाते उघडताना त्याचा उद्देश समजून घेतला पाहिजे. कोणतेही खाते उघडल्यानंतर त्यावरती होणाऱ्या व्यवहारांवरदेखील लक्ष ठेवले पाहिजे. याकरिता आपल्या शाखा स्तरावरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले पाहिजे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनात AML policy तयार केली पाहिजे. आपल्या संस्थेतील प्रत्येक व्यवहार आपण तपासू शकतो. एवढी आपली यंत्रणा सक्षम केली पाहिजे, तरच आपली संस्था सुरक्षित राहील!

जय सहकार...!

– **मंगेश देहेडकर**
Co-op trainer consultant
**मो. नं. – ९९२१३ ०४८११**

*****

# कोकणाबरोबर राज्यात आदर्श पतसंस्थेला सर्वोच्च स्थानावर नेण्याचा संकल्प

**पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष अभिजित सुरेश पाटील यांच्याशी सहकार सुगंधचे प्रतिनिधी मेघराज जाधव यांनी केलेली बातचित...**

कोकणात सहकार रुजविण्याचा काही मोजक्या अग्रणी पतसंस्थांमध्ये अलिबागमधील आदर्श पतसंस्थेचे योगदान मोठे आहे. एक हजार कोटींचा एकत्रित व्यवसायाचे उद्दिष्ट असून ४३५ कोटींहून अधिक ठेवी प्राप्त करत महाराष्ट्रात आदर्शला सर्वोच्च स्थानावर नेण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

सेवाभाव तसेच व्यावसायिक दृष्टिकोन, आर्थिक शिस्त आणि नवउद्योगशीलतेचा संगम अर्थात 'आदर्श नागरी क्रेडिट को-ऑप. सोसायटी, आज महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात एक ठळक आदर्श ठरत आहे. ही संस्था सरकारच्या सर्व नियामक नियमांचे पालन करत, अत्यंत पारदर्शक व व्यावसायिक पद्धतीने कार्य करत आहे. संस्थेमध्ये कोणतेही निर्णय भावनिक, राजकीय किंवा वैयक्तिक लाभासाठी घेतले जात नाहीत. ग्राहक आणि कर्मचारी यांच्या हिताच्या दृष्टीने प्रत्येक धोरण आखले जाते. यामुळेच 'आदर्श' ही संस्था केवळ एक पतसंस्था न राहता, एक आर्थिक परिवार म्हणून कार्यरत आहे.

संस्थेचे सर्व कामकाज खासगी कंपन्यांच्या कार्यपद्धतीप्रमाणे शिस्तबद्ध, डिजिटल आणि डेटा-ड्रिव्हन असून, सर्व शाखांमध्ये समान दर्जाची सेवा मिळावी यासाठी सिस्टिम बेस्ड प्रक्रिया वापरली जाते. आधुनिक सीबीएस प्रणाली, थर्ऱीीर्रि चॅटबॉट, मोबाईल ॲप, नेटबँकिंग अशा डिजिटल सुविधांचा प्रभावी वापर ग्राहकांच्या सोयींसाठी केला जातो. त्यामुळे वयोवृद्ध असो वा तरुण ग्राहक, प्रत्येकाला जलद आणि पारदर्शक सेवा मिळते. कामकाजामधील दर्जामुळे संस्थेला आय एस ओ ९००१-२०१५ मानांकन संस्थेला मिळालेले आहे.

*** आर्थिक स्थिती - ३१ मार्च २०२५ अखेरची ठळक वैशिष्ट्ये :-**

वसूल भागभांडवल - १८.४६ कोटी, सभासद संख्या - ४२९४५, स्वनिधी - ४७.८३ कोटी, ठेवी - ४३४.६६ कोटी, कर्जवाटप - ३१८.११ कोटी, एकत्रित व्यवसाय - ७५२.७७ कोटी, सोनेतारण व मुदत ठेव तारण कर्ज - १००.१२ कोटी, गुंतवणूक - १५१.३२ कोटी, कर्ज-ठेवी प्रमाण सीडी रेशो - ६६.३५, ढोबळ नफा - १०.५० कोटी, निव्वळ नफा - ७.५१ कोटी, एनपीए केवळ - ०.९६ टक्के.

वरील आकडे संस्थेचे केवळ आर्थिक यश दाखवत नाहीत, तर ही एक व्यवस्थापनाची गुणवत्ता, पुन:प्राप्तीची कार्यक्षमता आणि आर्थिक शिस्त यांची साक्ष देतात. विशेषतः ०.९६ टक्के ढोबळ एनपीए आणि शून्य टक्के निव्वळ एनपीए हे इतर कोणत्याही पतसंस्थेसाठी आदर्श ध्येय ठरू शकते. ही कामगिरी आम्ही ग्राहक विश्लेषण, योग्य कर्ज प्रक्रिया, कर्जपश्चात पाठपुरावा, कर्ज वसुलीच्या प्रभावी पद्धतीच्या जोरावर साध्य केली आहे. नावीन्यपूर्ण उपक्रम व सामाजिक जबाबदारी 'अनन्या योजना' हे आदर्शचे सर्वात नावीन्यपूर्ण आणि प्रभावी उपक्रमांपैकी एक. या योजनेत ३ ते १३ वयोगटातील १० हजारांहून अधिक बालकांना आर्थिक साक्षरतेच्या प्रवासात सहभागी करून त्यांच्यात बचतीची, नियोजनाची आणि जबाबदारीची सवय लावली आहे. या पुढील टप्प्यात पदवीधर व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ऋळपरपलश उीरिह ऊँीीशि घेणार आहोत, जेणेकरून स्थानिक युवकांना सहकारी क्षेत्रात व आर्थिक क्षेत्रात करिअरची दिशा सापडेल.

समाजासाठी कार्य करताना केवळ सीएसआर म्हणून नव्हे, तर एक सामाजिक बांधिलकी म्हणून विविध आरोग्य उपक्रम घेतो - रक्तदान शिबिरे, वैद्यकीय चाचणी मोहीमा, तसेच स्थानिक स्टार्टअप्ससाठी मार्गदर्शन व सहकार्य देतो. सामाजिक जाणीव म्हणून अनेक गरजू रुग्णांची मोतीबिंदू ऑपरेशन्स संस्थेतर्फे केलेली आहेत. इतर अनेक सामाजिक कामे संस्थेने केली आहेत. आज अनेक पतसंस्था 'आदर्श'ची कार्यपद्धती जवळून अभ्यासण्यासाठी भेट देतात. धोरणे, डिजिटल सेवा, आर्थिक साक्षरता उपक्रम, कर्मचारी प्रशिक्षण, पुनर्प्राप्ती मॉडेल आणि सामाजिक सहभाग पाहून अनेक संस्था स्वतःच्या कार्यपद्धतीत सुधारणा करत आहेत. महाराष्ट्र राज्य शासनाचा सहकार भूषण प्राप्त संस्था म्हणून आदर्शचे नाव आज सर्वदूर आहे. आदर्श'ची ही वाटचाल म्हणजे एक प्रेरणादायी मॉडेल आहे - जिथे आधुनिकता, व्यावसायिकता आणि सहकार मूल्ये यांचा उत्कृष्ट संगम आहे. सर्व सभासद, कर्जदार, ठेवीदार यांची मोलाची साथ हवी त्यांनी समर्थपणे संचालक मंडळाच्या पाठीशी राहावे असे आवाहन करून आदर्श पतसंस्थेप्रती व्यक्त केलेल्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही. आपुलकी जिव्हाळा व सहकार्याच्या बळावर पतसंस्थेला सर्वोच्च स्थानावर नेण्याचा संकल्प सिद्धीस नेऊन कोकणात नव्हे, महाराष्ट्रात आदर्शचे नाव उज्वल करू, असा सार्थ विश्वास अध्यक्ष पाटील यांनी व्यक्त केला.

*****

---

## उत्कर्ष सहकारी पतसंस्थेला आर्थिक वर्षात १.७० कोटीचा नफा

**वाई** - येथील उत्कर्ष सहकारी पतसंस्थेला आर्थिक वर्षात १.७० कोटीचा नफा झाला असून वर्षभरात संस्थेने उल्लेखनीय प्रगती केली आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्ष अनुराधा कोल्हापुरे यांनी सांगितली. त्या म्हणाल्या, संस्थेच्या एकत्रित व्यवसायात भरीव वाढ झाली असून एकूण व्यवसाय २१७ कोटींपेक्षा अधिक झाला आहे.

ठेवींमध्ये १७ कोटींची वाढ झाली असून त्या १२२ कोटी इतक्या झाल्या आहेत तर कर्ज वाटप ९५ कोटी करण्यात आले आहे. भाग भांडवल ७.९० कोटी झाले आहे. संस्थेच्या वतीने डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी विविध योजना राबविल्या आहेत, असे त्या म्हणाल्या.

## धन्वंतरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्षात २७१ कोटीचा संमिश्र व्यवसाय

**सातारा** - येथील धन्वंतरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्षात २७१ कोटीचा संमिश्र व्यवसाय केला असून वर्षभरात ३ कोटी ८६ लाख रुपये इतका ढोबळ नफा मिळविला आहे अशी माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्र भोसले यांनी सांगितली. संस्थेने वर्षभरात ५७ कोटी रुपयांचे सोनेतारण कर्जवाटप केले आहे. संस्थेच्या वतीने विविध योजनांसाठी वाजवी दरात कर्ज पुरवठा करण्यात येत आहे.

मार्च अखेर संस्थेच्या ठेवी १५६ कोटी ३१ लाख असून कर्जपुरवठा ११४ कोटी ४२ लाख इतका आहे. ९७ कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. स्वनिधी ४५ कोटी ८३ लाख रुपये असून खेळते भांडवल २२२ कोटी ४४ लाख रुपये असून सीडी रेशो ६५.४० टक्के आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली. मुख्य म्हणजे संस्थेने व्यवस्थापन खर्चाचे प्रमाण मर्यादित ठेवण्यावर भर दिला आहे.

# UCBच्या आधुनिकीकरणात क्लाउडची भूमिका

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका (UCBs) भारताच्या आर्थिक विकासात एक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. तसेच वाढत्या डिजिटायझेशन आणि सायबर सुरक्षेच्या आव्हानांचा सामना करताना, या बँकांना तांत्रिक परिवर्तन स्वीकारणे अत्यावश्यक झाले आहे. Cloud Computing या नवकल्पनाद्वारे UCBs त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून आणि खर्चात बचत करत, सुरक्षितता वाढवू शकतात व डिजिटल भविष्य घडवू शकतात. हा लेख याच परिवर्तनाचा एक व्यापक आढावा घेऊन येतो.

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक (UCBs) भारताच्या आर्थिक पायाभूत रचनेत लघु उद्योग, अल्प उत्पन्न गट आणि अनबँक्ड लोकसंख्येसाठी सेवा देतात..

आज, जलद गतीने डिजिटायझेशन होत असलेल्या जगात, ग्राहकांच्या अपेक्षा, नियामक आदेश आणि सायबर सुरक्षेची वाढती गरज या पार्श्वभूमीवर UCBs ना स्वतःचा झपाट्याने कायापालट करणे आवश्यक झाले आहे. Cloud Computing हे एक प्रभावी माध्यम आहे जे UCBs ना आधुनिक, किफायतशीर, सुरक्षित आणि स्केलेबल IT पायाभूत सुविधा प्रदान करते.

UCBs साठी Cloud का महत्त्वाचे आहे?

*** Cloud तंत्रज्ञान UCB चे खालील प्रमुख अडचणी सोडवते:**

| क्षेत्र | समस्या | Cloud लाभ | परिणाम |
|---|---|---|---|
| खर्च कार्यक्षमता | मर्यादित IT भांडवली गुंतवणूक | Pay-as-you-go (OPEX) मॉडेल मुळे C-PEX मॉडेल निघून जाते. | परवडणारे आधुनिकीकरण |
| स्केलेबिलिटी | अनुदान वितरणात वाढती मागणी | मागणीनुसार Dynamic Scaling | उच्च कार्यक्षमता |
| सुरक्षा व अनुपालन | कमकुवत सायबर सुरक्षा | Enterprise-grade सुरक्षा व RBI/ ISO/PCI-DSS चे अनुपालन | सुरक्षित व अनुरूप प्रणाली |
| डिजिटल सेवा वितरण | जुन्या प्रणालींमुळे मर्यादा | APIs, Apps d Chatbots द्वारे जलद सेवा रोलआउट | ग्राहक समाधानी |
| Disaster Recovery | डेटा लॉस व सिस्टम आउटेज | Built-in Backup d Failover Systems | न्यूनतम downtime |

क्लाउड केंद्रीकृत प्लॅटफॉर्मद्वारे (उदा., CRM, ॲनलीटीक टूल्स) सहकार्याला प्रोत्साहन देते, ज्यामुळे शाखांमध्ये पेपरलेस ऑपरेशन्स आणि रिअल टाइम संप्रेषण शक्य होते.

*** UCBs साठी Cloud चे मुख्य फायदे :-**

- Operational Efficiency: IT मधील भांडवलीसाठीची गुंतवणूक कमी होते.
- Real-time Scalability: कामाच्या लोडनुसार त्वरित संसाधन समायोजन करता येते.
- Cybersecurity: प्रगत संरक्षण आणि धोका व्यवस्थापन करता येते.
- Continuity: Disaster Recovery सह उच्च उपलब्धता करता येते.
- Fintech Integration: APIs व Sandbox द्वारे जलद नवकल्पना करता येते.
- Regulatory Compliance: Data Residency व Audit Trails मध्ये सुविधा करता येते.

*** क्लाउडद्वारे युसीबीचे आधुनिकीकरण –**

| क्षेत्र | समस्या | Cloud उपाय | लाभ |
|---|---|---|---|
| Core Banking System (CBS) | जुनी व अकार्यक्षम प्रणाली | Cloud-hosted CBS व Real-time प्रोसेसिंग | विश्वासार्ह, लवचिक बँकिंग |
| डिजिटल सेवा वितरण | मोबाईल व ऑनलाइन सेवांचा अभाव | Chatbots, Loan Portals, Whatsapp Banking | जलद सेवा व वाढलेला ग्राहक अनुभव |
| पायाभूत सुविधा अनुकूलन | CAPEX व ऑपरेशनल खर्च जास्त | SaaS आधारित उपाययोजना | कमी खर्च व जास्त कार्यक्षमता |
| सायबर सुरक्षा | अपुरी संरक्षण प्रणाली | Zero-trust Architecture d Monitoring Tools | धोका कमी व विश्वसनीयता वाढ |
| डेटा ॲनालिटिक्स व AI | बिखरलेला डेटा व मंद निर्णय | Cloud BI Tools a AI Models | डेटा आधारित निर्णय क्षमता |
| Fintech सहकार्य | नव्या प्लॅटफॉर्मशी इंटीग्रेशनची अडचण | Open -PIs व Sandbox वातावरण | जलद नवकल्पना व उत्पन्न वाढविणे |
| सायबर सुरक्षा | अपुरी संरक्षण प्रणाली | Zero-trust Architecture व Monitoring Tools | धोका कमी व विश्वसनीयता वाढ |
| डेटा ॲनालिटिक्स व AI | बिखरलेला डेटा व मंद निर्णय | Cloud BI Tools व AI Models | डेटा आधारित निर्णय क्षमता |
| Fintech सहकार्य | नव्या प्लॅटफॉर्मशी इंटीग्रेशनची अडचण | Open APIs व Sandbox वातावरण | जलद नवकल्पना व उत्पन्न वाढविणे |

*** Cloud स्वीकारताना UCBs समोरील प्रमुख आव्हाने –**

- Legacy Systems: विद्यमान प्रणाली व Cloud मध्ये सुसंगततेचा अभाव
- बजेट मर्यादा: मर्यादित निधी व प्रशिक्षित मनुष्यबळ
- Regulatory Compliance: डेटा स्थानिकीकरण व RBI नियमांचे पालन
- संस्कृतीगत अडथळे: नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी मानसिक अडथळे

* योग्य Cloud मॉडेलची निवड –

भारतामध्ये IT आणि बँकिंगसाठी कडक नियामक अटी लागू आहेत:

- RBI IT फ्रेमवर्क
- डेटा लोकलायझेशन संबंधित नियम
- NPCI आणि CERT-In मार्गदर्शक तत्वे

**❊ उपलब्ध Cloud पर्याय –**

| मॉडेल | वापर | फायदा |
|---|---|---|
| Private Cloud | Core Banking व संवेदनशील डेटा | उच्च नियंत्रण व सुरक्षा |
| Public Cloud | Analytics, Customer Apps | कमी खर्च व जलद विस्तार |
| Hybrid Cloud | मिश्र वर्कलोड्स | सुरक्षितता व लवचिकतेचा संतुलित उपाय |

**❊ सर्वोत्तम पद्धत:** असे सेवा प्रदाते निवडावेत जे भारतात डेटा सेंटर्स चालवतात आणि ISO २७००१, PCI-DSS, RBI चे अनुपालन प्रमाणपत्रे प्राप्त करतात.

Cloud **सेवा प्रदात्यांचे मूल्यांकन: एक तपासणी यादी**

| श्रेणी | प्रमुख प्रश्न |
|---|---|
| नियामक अनुपालन | RBI व डेटा स्थानिकीकरण नियमांचे पालन आहे का? |
| डेटा रेसिडेन्सी | सर्व ग्राहक डेटा भारतात साठवला जातो का? |
| सुरक्षा वैशिष्ट्ये | Encryption, MFA व Access Control आहेत का? |
| प्रमाणपत्रे | ISO 27001, PCI-DSS, SOC २ चे प्रमाणन आहे का? |
| SLA | ≥99.9% Uptime गॅरंटी व दंड आहेत का? |
| खर्च संरचना | पारदर्शक व OPEX आधारित आहे का? |
| Disaster Recovery | Geo-redundant Backup व DR योजना आहेत का? |
| सपोर्ट सेवा | 24x7 तांत्रिक सहाय्य उपलब्ध आहे का? |
| इंटर ऑपरेबिलिटी | इतर प्रणालींसोबत Migration व Integration शक्य आहे का? |
| Fintech Integration | AI, Open APIs a Fintech टूल्सना समर्थन आहे का? |

**❊ NUCFDC आणि Sahakar Cloud यांची महत्त्वाची भूमिका :**

National Urban Cooperative Finance and Development Corporation (NUCFDC) द्वारे Sahakar Cloud हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे– विशेषतः UCBs साठी डिझाइन केलेला एक Private/Hybrid Community Cloud.

**❊ Sahakar Cloud मध्ये खालील सुविधा आहेत:**

Pay-per-use मॉडेल: कमी भांडवलमध्ये आधुनिक IT सुविधा.

Cyber Resilience: Zero-day Threats विरुद्ध संरक्षक आर्किटेक्चर.

Regulatory Compliance: RBI मान्यताप्राप्त अनुपालन आणि ऑडिट डॅशबोर्ड.

AI व Analytics सेवा: Fraud Detection, Data Analytics व Real-time Dashboards.

Comprehensive Services: CBS Hosting, Cybersecurity, DR, Backup Solutions, Fintech Integration.

Sahakar Cloud मुळे UCBs ना त्यांचा IT ओव्हरहेड कमी करणे, व्यावसायिक सातत्य वाढविणे व डिजिटल परिवर्तन गतीमान करणे शक्य होईल. यात Core Banking Systems, UPI Switches, Payment Settlement Systems, Mobile आणि Internet Banking, Loan Origination Systems यांसारख्या अनेक सेवा देखील सामाविष्ट असतील.

आजच्या स्पर्धात्मक डिजिटल युगात टिकून राहण्यासाठी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी Cloud Computing स्वीकारणे आवश्यक आहे. NUCFDC च्या Sahakar Cloud द्वारे, UCBs ना अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि भविष्यकालीन सेवांसाठी सज्ज होण्याचा मार्ग खुला झाला आहे.

स्मार्ट बँकिंगचा आधार म्हणजे स्मार्ट Cloud स्वीकारणे!

याबाबत नव्याने स्थापन झालेल्या अंब्रेला ऑर्गनायझेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रभात चतुर्वेदी यांच्याशी ९३७२६ ८९८९० या मोबाइलवर संपर्क साधावा.

*****

# राज्य सहकारी बँकेचे सायबर सिक्युरिटी सेंटर बँका, पतसंस्थांना उपलब्ध

**पुणे –** सायबर गुन्हेगारीमुळे बँकाच्या समोर विविध आव्हाने निर्माण झाली आहेत. बँकेतील ग्राहकांच्या व्यवहाराची माहिती सुरक्षित राहावी, यासाठी राज्य सहकारी बँकेने नवी मुंबई येथील प्रशासकीय कार्यालयात अद्ययावत सायबर सिक्युरिटी सेंटर उभारले आहे.

याचा बँक आणि पतसंस्था यांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सेंटरमध्ये बँकेचे हार्डवेअर, लायसन.सॉफ्टवेअर, डी. आर. साईट मनुष्यबळ आदी माहिती देण्यात आली आहे. सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नागरी सहकारी बँक ग्रामीण बिगर शेती पतसंस्था यांनी सेंटरला भेट द्यावी व उपयोग करावा, असे आवाहन सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी केले आहे.

# पुणे पीपल्स को-ऑप. बँकेचा व्यवसायाचा २७०० कोटी रुपयांचा टप्पा पार

**पुणे –** पुणे पीपल्स को-ऑप. बँकेने व्यवसायाचा २७०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला असून २३ कोटी ९० लाख रुपये नफा मिळविला आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष जनार्दन रणदिवे यांनी सांगितली. संस्थेच्या वतीने साडे बारा टक्के लाभांश देण्यात आला.

बँकेने शून्य टक्के एनपीए राखण्यात यश मिळविले आहे तर सीडी रेशो ६५.७० राखला आहे. बँकेच्या सध्या २१ शाखा आणि १ विस्तारीत कक्ष कार्यरत आहेत. बँकेने ग्राहकांना सर्व स्वरुपाच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. नजीकच्या काळात बँकेच्या बारामती आणि सभाजीनगर येथे नव्याने शाखा सुरू करण्यात येणार आहेत.

# विद्या सहकारी बँक सणसवाडी शाखा सुरू करणार

**पुणे –** विद्या सहकारी बँकेने आजवर ६६८ कोटींपेक्षा अधिक व्यवसाय केला असून भांडवल १२ कोटी ६७ लाख इतके झाले आहे तर एनपीए प्रमाण ५.७६ टक्के इतके आहे. अशी माहिती बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी सांगितली. बँकेने आरबीआयच्या सर्व निकषांचे काटेकोरपणाने पालन केले आहे.

नजीकच्या काळात बँकेची नवीन शाखा सणसवाडी येथे सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. बँकेने ५२ व्या वर्षात पदार्पण केले आहे, असे नमूद करून ते म्हणाले, बँकेने सामाजिक बँकिंग ही संकल्पना सर्वप्रथम राबविली आहे. तसेच अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. याखेरीज बँक जनतेमध्ये बँकिंग साक्षरतेचे कार्य अविरतपणे करीत आहे.

# धन्वंतरी पतसंस्था सहकारातील दीपस्तंभ : ३५ वर्षांची देदिप्यमान वाटचाल

**सहकारभूषण, धन्वंतरी पतसंस्था ही वैद्यकीय क्षेत्रातील लोकांनी मिळून उत्तमरित्या चालविलेली महाराष्ट्रातील सर्वोत्तम संस्था आहे. सन १९८९ पासून ते आजपर्यंतच्या ३५ वर्षांतील या पतसंस्थेचा प्रवास अनेकांच्या जडणघडणीत महत्त्वाचा ठरला आहे. सहकारातील कायदा, नियम व पोटनियमाच्या अधीन राहून सहकाराचा विचार सभासदांच्या हितासाठी वापरण्याचे सांघिक कार्य करुन संस्था लौकिक दिवसेंदिवस वाढवत आहे. पतसंस्थेच्या सदरबझार शाखेचे स्थलांतर झाले आहे. त्यानिमित्त....**

वैद्यकीय व्यावसायिकांचे आराध्य दैवत श्री धन्वंतरी देवतेचे नाव या पतसंस्थेला देणे म्हणजे खऱ्या अर्थाने वैद्यकीय क्षेत्राचा सहकार क्षेत्रात प्रवेश होणे असे समजून पतसंस्थेला धन्वंतरी पतसंस्था असे नामकरण करण्यात आले. स्थापनेपासून प्रत्येक वर्षी सर्वोच्च असा ऑडिट वर्ग 'अ' मिळवणारी एकमेव पतसंस्था होण्याचा बहुमान 'धन्वंतरी पतसंस्थे'ने मिळविला आहे. संगणकीय युगाचे महत्त्व ओळखून दूरदर्शीपणाने सन १९९४-९५ या वर्षी संस्थेने पहिला संगणक खरेदी करून आपले काम संगणकीकृत केले.

आजमितीस संस्थेने सीबीएस ही अत्याधुनिक संगणक प्रणाली कार्यान्वित केली आहे. इतर बँकांप्रमाणे आपल्या संस्थेनेही ग्राहकांना डिजिटल सेवा द्यावी तसेच त्यांचे व्यवहार सुलभ व त्वरित व्हावेत यासाठी संचालक मंडळाने अत्याधुनिक ऑनलाईन स्वत:ची सीबीएस संगणक प्रणाली सुरक्षिततेसाठी स्वत:च्या डाटा सेंटरसह करण्याचा निर्णय घेतला. सदर सीबीएस प्रणाली २४ तास विनाखंड कार्यरत राहावी, याकरिता आधुनिक फायबर इंटरनेट, यूपीएस, जनरेटर इ. बाबीही संस्थमध्ये कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. आधुनिक प्रणालीमुळे संस्थेच्या ग्राहकांना इंटरनेट बँकिंग, ऑनलाईन बँकिंग, मोबाईल ॲप्लिकेशन इ. सुविधा विनासायास मिळत आहेत. तसेच संस्थेच्या सातारा शाखेमध्ये लवकरच एटीएम मशीन कार्यान्वित होणार आहे. संस्थेचे ग्राहक स्वत:च्या बँक खात्यातून संस्थेच्या खात्यामध्ये रक्कम एनईएफटी, आयएमपीएस, आरटीजीएस द्वारे जमा तसेच काढू शकत आहेत. तसेच विविध बँकिंग ॲप उदा. जी पे, फोन पे, पेटीएम इ. द्वारेही संस्थेच्या खात्यामध्ये रक्कम जमा होत आहे. यामुळेच एपीआय प्रणाली वापरणारी धन्वंतरी पतसंस्था ही महाराष्ट्रातील पहिली संस्था ठरली आहे. डिजिटल धन्वंतरीचे स्वप्न पूर्ण करताना विशेष आनंद होत आहे.

आजमितीस संस्थेची सभासद संख्या १३,७३० आहे. भाग भांडवल रु. १०.८२ कोटींचे वर आहे. ठेवी रु. १५६.३१ कोटींचे वर आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे ठेवीदारांचा संस्थेवर असलेला प्रचंड विश्वास. तसेच सदर भांडवलातून संस्थेने रु. ११४.४१ कोटींचे वर कर्जवाटप केले आहे. एकूण व्यवसाय रु. २७१ कोटी,स्वनिधी रु. ५०.६१ कोटी, तसेच रु. ९७.३७ कोटी सुरक्षित व उत्तम बँकामध्ये गुंतवणूक केली आहे. तसेच निव्वळ एनपीएचे प्रमाणही अत्यल्प ठेवले आहे.सहकार महर्षींच्या निकषांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने संस्थेची वाटचाल सुरू आहे. मुदत ठेवीकरिता वार्षिक व्याजदर ७.२५%, ज्येष्ठ नागरिकांना ७.७५% इतका व्याजदर ठेवला आहे. सोनेतारण, गृह व नवीन वाहन खरेदीसाठी व्याजदर ८.७५% आहे. तसेच गाळा, प्लॉट व व्यवसायासाठी सर्वांसाठी तत्पर व सुलभ कर्जाची सोय उपलब्ध आहे. संस्थेची सक्षमता अधिक भक्कम व्हावी यासाठी सात शाखांपैकी सहा शाखा स्वमालकीच्या वास्तूत कार्यरत आहेत.

महाराष्ट्र राज्य फेडरेशन या संस्थेने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रथम क्रमांकाची आदर्श पतसंस्था म्हणून गौरविले आहे. तसेच सातारा जिल्हा फेडरेशननेही सातारा जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाची आदर्श पतसंस्था म्हणून गौरविले आहे. या सर्व पुरस्कारांमध्ये अत्यंत प्रतिष्ठित समजला जाणारा व महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागातर्फे दिला जाणारा सन २०१५-१६ करिताचा सहकार भूषण पुरस्कार तत्कालीन राज्यपाल महामहीम सी. विद्यासागर राव यांचे शुभहस्ते संस्थेस प्राप्त झाला आहे. 'धन्वंतरी पतसंस्थे'च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा मिळाल्याबद्दल सर्व धन्वंतरी कुटुंबाला व समस्त शाहूवासियांना सार्थ अभिमान आहे. सभासदांच्या सोयीसाठी संस्थेच्या सातारा शाखेत लॉकर सुविधा सुरु केली आहे. तसेच संस्था प्रतिवर्षी सभासदांना लाभांश देते. त्याप्रमाणे गतवर्षीचाही १०% लाभांश सभासदांना वाटप करण्यात आला आहे. पतसंस्थेने आर्थिक स्थिती भक्कम करत समाजातील गरीब व गरजू लोकांसाठी छोट्या कार्यक्रमांसाठी अत्यल्प दरात सुसज्ज व गरजेच्या सुविधांसह धन्वंतरी हॉलची सुविधा कार्यान्वित केली आहे. सभासदांसाठी मोफत वाचनालय पतसंस्थेने सुरु केले आहे. वेळोवेळी शासनाच्या व समाजोपयोगी विविध उपक्रमांमध्ये संस्थेने भाग घेऊन ते प्रभावीपणे राबविले आहेत. संस्था सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून नेहमीच आपले योगदान देत असते. भविष्यात वाढवलेल्या कार्यक्षेत्राच्या निवडक जिल्ह्यात शाखाविस्तार करणे व आयएसओ मानांकन घेण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

स्थापनेपासून पतसंस्थेस भक्कम स्थिती प्राप्त करुन देण्यात विशेषत: संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्र भोसले यांचे पारदर्शी व अभ्यासू नेतृत्व तसेच उपाध्यक्ष डॉ. कांत फडतरे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय पवार व संचालक डॉ. अरविंद काळे, डॉ. शिरीष भोईटे, डॉ. शकील अत्तार, डॉ. सुनील कोडगुले, डॉ. हेमंत शिंदे, डॉ. अभिजित भोसले, डॉ. राजेंद्र जाधव, डॉ. श्रीरंग डोईफोडे, डॉ. जयदीप चव्हाण, डॉ. नारायण तांबे, ॲड. सूर्यकांत देशमुख, डॉ. सौ. सारिका मस्कर, डॉ. सौ. हर्षला बाबर, सर्व सभासद व सल्लागार, हितचिंतक, मार्गदर्शक व सेवक वर्गाचा मोलाचा सहभाग आहे.

**– संजय पवार, कार्यलक्षी संचालक, सीईओ.** ****

## राज्यातील पतसंस्था चळवळ सक्षम करण्यावर भर

**पुणे –** राज्यातील पतसंस्था चळवळ सक्षम करण्याबरोबर आर्थिक शिस्तीचे काटेकोरपणाने पालन होण्यासाठी राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाच्या बैठकीत एकमत करण्यात आले. नवनियुक्त नियामक मंडळाची पहिली सभा राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सहकार खात्याचे अपर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, उपनिबंधक मिलिंद सोबले, तसेच नियामक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## गडहिंग्लज अर्बन बँकेला ४.५२ कोटीचा नफा

**गडहिंग्लज, कोल्हापूर –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात गडहिंग्लज अर्बन बँकेला ४.५२ कोटीचा नफा झाला आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष जितेंद्र नाईक यांनी सांगितली. ते म्हणाले, काही वर्षांपूर्वी तोटा सहन करण्याची वेळ आली होती. आरबीआयने जे निर्बंध घातले होते ते हटविण्यात आले आहेत. मात्र केवळ डिव्हिडंड देण्याबाबतचा निर्णय दूर होण्याची अपेक्षा आहे. बँकेची प्रगती ही सहकार क्षेत्राला दिशादर्शक ठरणारी आहे असे त्यांनी सांगितले.

# सहकार भारतीच्या प्रदेश बैठकीत सहकार क्षेत्रातील विविध विषयांवर विचारमंथन






**मुंबई** – सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीचे उद्घाटन सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार नरेंद्र मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे बैठक उत्साहात पार पडली. यावेळी राष्ट्रीय महामंत्री गजेंद्र गौतम, सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, महामंत्री विवेक जुगादे, संघटन प्रमुख शरद जाधव व पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीस सहकार भारतीचे राज्यभरातून प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या सध्याच्या घडामोडींवर सखोल चर्चा झाली. सहकार संस्था, बँका, सेवा सहकार सोसायट्या, कृषी प्रक्रिया उद्योग आणि ग्रामीण भागातील सहकार चळवळीच्या सक्षमीकरणासाठी नवीन योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांवर विचारमंथन करण्यात आले.

प्रदेश कार्यकारिणीच्या सदस्यांनी आपल्या भागातील सहकार संस्थांच्या अडचणी, प्रगती व भविष्यातील संधी याविषयी अभ्यासपूर्ण मते मांडली. यावर मार्गदर्शक सूचना आणि धोरणात्मक भूमिका निश्चित करण्यात आली.

सहकार क्षेत्रासमोर असलेल्या आव्हानांचा सामना कसा करता येईल आणि नव्या पिढीला सहकार क्षेत्रात सहभागी करून घेण्याचे उपाय, डिजिटायझेशन, पारदर्शकता व उत्तरदायित्त्व यावर भर देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

राष्ट्रीय मंत्री गजेंद्र गौतम यांनी बैठकीचा समारोप केला. तत्पूर्वी प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी नियोजन विषयावर मार्गदर्शन केले. क्षेत्रिय प्रचारक सुमंत आमशेकर यांनी संघ शताब्दी व पंच परिवर्तन या संदर्भातील संघाचे कार्य अपेक्षा संदर्भात संवाद साधला. समाजातील भेदभाव नसावेत. या पंचसुत्री १) पर्यावरण २) नागरिक कर्तव्य ३) समरसता ४) स्वदेशी व ५) कुटुंब प्रबोधन या विषयाची मांडणी केली. वैचारिक विषय – वामपंथी विचारधारेला रोध लावणे, सजग राहणे, सज्जन व्यक्तिला सोबत घेणे अशा संदर्भात मार्गदर्शन केले.

मुंबई विभागाने काढलेल्या पुस्तिकेचे सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते प्रकाशन झाले.




दि. ३ व ४ मे रोजी झालेल्या सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये सुनील कुऱ्हेकर यांची अमरावती विभाग सहप्रमुख म्हणून निवड करण्यात आली. प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. त्यांच्या या निवडीबद्दल रिझर्व बँक ऑफ इंडियाचे संचालक तसेच सहकार भारतीचे संस्थापक सदस्य सतीश मराठे व राष्ट्रीय मंत्री गौतम यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

तसेच प्रदेश सहकारी बँक प्रकोष्ट सहप्रमुख शंतनू जोशी, प्रदेश विधी प्रकोष्ट प्रमुख रामेश्वर खोंड, जिल्हा अध्यक्ष रामेश्वर फुंडकर, महामंत्री जैनेंद्र लुंकड, जिल्हा संघटन मंत्री संजीव जोशी, महिला प्रमुख राधिका परचुरे, सहप्रमुख मंजुषाताई सोनटक्के अन्य पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



# कर्तबगार आणि लोकाभिमुख नेतृत्व : आमदार महेश शिंदे



आमदार महेश शिंदे

सलग दोन टर्म कोरेगांव मतदार संघाचे आमदार, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (कॅबिनेट मंत्री दर्जा) महेश संभाजीराजे शिंदे हे कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील आदरणीय आणि कर्तबगार राजकीय व्यक्तिमत्त्व आहेत. कर्तबगारीने आणि जनसेवेच्या तळमळीने त्यांनी लोकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. पहिल्याच कार्यकाळात त्यांनी मतदारसंघाचा कोट्यावधी रुपयांचा निधी आणून कायापालट केला. मतदार संघाची राजधानी असलेल्या कोरेगाव शहरातील संपूर्ण चित्रच त्यांनी बदलून टाकले. याच दमदार कामगिरीच्या जोरावर त्यांनी नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत सलग दुसऱ्यांदा ४८ हजारांच्या मताधिक्याने घवघवीत विजय मिळवून पुन्हा एकदा नव्या उमेदीने त्यांनी कामाला सुरूवात केली आहे. त्यांच्या या कार्यप्रणालीवर टाकलेला हा प्रकाशझोत....

आमदार शिंदे यांचा जन्म दि. ८ ऑगस्ट १९७५ रोजी सातारा जिल्ह्यातील जाखणगाव येथील सामान्य शिक्षक असलेल्या कुटुंबात झाला. त्यांचे संपूर्ण जीवन समाजसेवेसाठी समर्पित आहे.

